परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव।'

अमृतकुंभ

अंतरंग

वर्ष ११ • अंक १ • एप्रिल - मे २०१७

मुखपृष्ठाविषयी

ज्ञानसागर शिवबाबांनी दिलेल्या श्रीमतानुसार जी मुले श्रेष्ठ कर्म करतात, अमृतवेळेपासून रात्री झोपेपर्यंत आखून दिलेल्या दिनचर्येप्रमाणे आपली दिनचर्या व्यतीत करतात; व्यर्थ संकल्प - विकल्पांपासून दूर रहातात, अशा मुलांची स्थिती नेहमीच प्रसन्न आणि श्रेष्ठ राहते. ते नेहमी बंधनमुक्त व हलके असतात.

मुखपृष्ठावरील चित्रात हाच आशय दर्शविण्याचा सुंदर प्रयत्न केला आहे. सदा प्रसन्न आणि हलकेपणाची स्थिती दर्शविण्यासाठी चित्रात योगीला फुलपाखराचे पंख दाखविले आहेत. तसेच बंधनमुक्त स्थिती दर्शविण्यासाठी कुलुप उघडलेले आणि त्यातून मुक्त झालेला योगी-असे दाखविण्यात आले आहे. आपल्याला त्यातील भाव नक्कीच आवडेल, असे वाटते.

- प्रकाशक अमृतकुंभ

१. आनंद – मौज! २
२. स्वमान हा आत्म्याचा सन्मान.... (संपादकीय) ४
३. स्वये शिवबाबा वदती (कविता) ६
४. ज्ञानाची गाडी (बालगीत) (कविता) ६
५. चिंतन बदला तर परिस्थिती बदलेल.. ७
६. नात्याचा हा खेळ, आहे किती गोड.. १०
७. आत्मदृष्टीने सृष्टी बघावी (कविता) १२
८. चैतन्य दीपगृह – दीपस्तंभ बनूया १३
९. सचित्र सेवावृत्त १७
१०. महावीर हनुमान २१
११. ईश्वरीय कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता..... २३
१२. कर्मधर्मसंयोग व राजयोग २६
१३. जन्मजन्मांतराची कर्मबंधने नष्ट करूया.... (भाग १) २८
१४. भारतीय समाजातील दुर्लक्षित व वंचित घटक – तृतीयपंथीय ३०
१५. बाबा! तुझ्या कृपेने धन्य जीवन झाले (अनुभव) ३४
१६. सचित्र सेवावृत्त ३५

• **वार्षिक वर्गणी** रू. ६५/-

• **आजीव सभासद वर्गणी** रू. १,३००/-

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या -

www.amrutkumbh.com

• फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता : बी. के. शिवाजी, संपादक - अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज् ए - १०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३. • वर्गणी पाठविण्याचा पत्ता : बी. के. गोदावरी, प्रकाशक-अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज् ए -१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३. फोन : ०२२ - २५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२ • E-mail :info@amrutkumbh.com.

• संगणक अक्षरजुळवणी : मीडिया आर ॲण्ड डी प्रा. लि. १३, अमृत मधुरा, चारकोप, कांदिवली (प) मुंबई – ४०० ०६७.

डिमांड ड्राफ्ट 'अमृतकुंभ, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय' या नावाने पाठवावा.

आनंद - मौज!

आदरणीय भ्राता जगदीशजी (संजय) यांच्या लेखणीतून

"राजयोगी वरिष्ठ भ्राता जगदीशजी सन १९५२ मध्ये ज्ञानात आले होते. त्यानंतरचे संपूर्ण आयुष्य त्यांनी त्याग, तपस्या व सेवेत पूर्णत: सफल केले. ते नेहमी हेच म्हणत की संगमयुगाचा समय, हा एकदा का आपण वाया घालवला तर कल्प-कल्प तो असाच वाया जाईल. त्यामुळे त्यांनी आपल्या जीवनातील एक क्षण देखील व्यर्थ जाऊ दिला नाही. भ्राता जगदीशजी श्रेष्ठ चरित्राचे धनी, सर्वगुणांचे धनी, लेखनीचे धनी, ईश्वरीय प्रेमाचे धनी होते. ते ज्ञानामृत, वर्ल्ड रिन्युअल, प्युरिटी या मासिकांचे मुख्य संपादक होते. त्यांनी ईश्वरीय ज्ञानावर आधारित सुमारे २०० पुस्तके लिहिली. त्यांना प्राणेश्वर बापदादांनी 'संजय' तसेच 'गणेश' या उपाधींनी अलंकृत केले होते. त्यांचे जीवन दधिची ऋषीप्रमाणे ईश्वरीय यज्ञात समर्पित होते. त्यांची महानता, दिव्यता, अलौकिकता अवर्णनीय अशी आहे. **आदरणीय भ्राता जगदीशजी यांची १२ मे २०१७ रोजी १६ वी पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त विश्वभरातील सर्व ब्रह्मावत्सांची त्यांच्या पावन स्मृतीला भावपूर्ण श्रद्धांजली!**
- संपादक"

लोक म्हणतात की, ईश्वर मीलन, प्रभू मीलन हेच आमच्या जीवनाचे ध्येय आहे. हीच सर्वोच्च प्राप्ती आहे. तात्पर्य म्हणजे ज्याला ही प्राप्ती झाली किंवा होईल, तीच व्यक्ती सर्वांत जास्त आनंदी असेल.

बऱ्याचदा आपण एकमेकांना भेटतो. त्यावेळी विचारतो- काय मजेत आहात? ही एक पद्धत आहे. पत्रात लिहितात, आशा आहे की आपण आनंदात असाल. कोणी कुशल-मंगल लिहितात. आपण समजत होतो की, आनंद-मौज म्हणजे खुशीत राहणे; या अर्थानेच आपण एकमेकांशी बोलत असू किंवा पत्र लिहित असू. परंतु शिवबाबा म्हणतात की, चार प्रकारची मौज असते. आपण कोणाला विचारले की, तुम्ही आनंदात आहात-मजेत आहात? तर उत्तर मिळते की हो, आनंदात मजेत आहोत. त्यानंतर तुम्हाला विचारावे लागेल की आपण कोणत्या प्रकारच्या मजेत आहात?

शिवबाबा सांगतात की पहिली मौज आहे - मीलनाची मौज

परमेश्वराशी मीलन झाले, यापेक्षा दूसरी मोठी मौज ती काय असू शकते! काय आपण या आनंदात आहोत? लोक म्हणतात की, ईश्वर मीलन, प्रभू मीलन हेच आमच्या जीवनाचे ध्येय आहे. हीच सर्वोच्च प्राप्ती आहे. तात्पर्य म्हणजे ज्याला ही प्राप्ती झाली किंवा होईल, तीच व्यक्ती सर्वांत जास्त आनंदी असेल.

दूसरी आहे - सर्व प्राप्तींची मौज

जेव्हा परमपित्याशी आपले मीलन झाले. तेव्हा आत्म्याला सर्व प्राप्ती झाल्या. आपले मन भरून आले-गदगद झाले. चित्त संतुष्ट झाले. आता आणखी आपल्याला काहीच नको. लोकांबरोबर जर, तुम्ही दहा मिनिटे बोलाल तर त्यांच्या तोंडी 'पाहिजे-पाहिजे' हेच शब्द असतात. आम्हाला हे पाहिजे, त्या व्यक्तीमध्ये हे हवे, सरकारला हे करायला पाहिजे, आजकाल दुनियेत हे पाहिजे. **परंतु जो मजेत असतो, त्याला हा अनुभव असतो की, सर्व काही प्राप्त झाले आहे. माझ्या सर्व मनोकामना पूर्ण झाल्या आहेत. माझे मन जरासुद्धा असंतुष्ट नाही. अजून काहीच मला नको. जे पाहिजे होते. ते सर्व मला मिळाले.**

तिसरी मौज आहे - समीप असण्याची मौज

ज्याला ईश्वर भेटला. तो समजतो की मी परमात्मा पित्याच्या समीप आहे. समाजात पहा; एखाद्या सामान्य व्यक्तीची कोणी विशेष गणमान्य व्यक्तींशी ओळख असेल तर ती व्यक्ती खुशीत असते. ती समजते की इतक्या मोठ्या लोकांशी माझी ओळख आहे, माझे कोणतेही काम सहज होऊ शकते! त्याच प्रकारे ज्याची परमपिता शिवाशी तसेच त्याचे गुण, कर्तव्य व स्वभाव-संस्कारांशी समीपता आहे. तो कायमच मजेत राहील!

चौथी मौज आहे - समान बनण्याची मौज

ज्या व्यक्तीमध्ये ईश्वरीय गुण आहेत ती व्यक्ती ईश्वर पित्यासमान बनते. भक्तिमार्गात प्रार्थना करतात. हे ईश्वरा. तू खूप दयाळू आहेस. कृपाळू, सुखकर्ता, दु:खहर्ता आहेस. पण आता हेच गुण ज्याच्यामध्ये येतात, अथवा धारण होतात. तर ती व्यक्ती ईश्वरासमान बनते. जो अशाप्रकारे ईश्वर पित्यासमान बनतो, तोच या मजेत राहतो.

त्यामुळे जर तुम्हाला कोणी विचारलं की तुम्ही आनंदात मजेत आहात का? तर तुम्ही विचार करून उत्तर द्या. शिवबाबांनी पुढे त्या ज्ञान मुरलीत हेही सांगितले आहे की सदैव चेक करा, मी या चारही प्रकारच्या मजेत आहे का? जेव्हा जगातील सर्व बँका बंद असतात. तेव्हा एक बँक जरुर चालू असते, ती नेहमीच चालू असते. ती कोणती बँक? त्या बँकेला कधी सुट्टी नसते. ती आहे, ईश्वरीय बँक. त्या बँकेचे व्यवहार सतत सुरूच असतात. त्यात आपल्या कर्मांचे व्यवहार सुरू असतात. त्या बँकेत आपल्या खात्यात जमा करणे किंवा काढणे; चालूच असते. चेक जमा होत राहतात आणि चेक दिलेही जातात. शिवबाबांनी सांगितले, शुभ भावनारूपी चेकद्वारे आपल्या खात्यात किती जमा झाले. यावरही लक्ष ठेवा. प्रत्येकासाठी शुभ भावना आणि शुभ कामना देत रहा. जर अन्य काही देऊ शकत नसाल तर हे तर सर्वांना देऊच शकता! यामध्ये तर काही खर्च नाही! चेक करणे - आत्मपरिक्षण करणे म्हणजे आपल्या कर्माच्या बँकेत धनादेश जमा करणे; होय. धनादेश दोन प्रकारचे असतात. एक बेअरर चेक (Bearer cheque) दूसरा (Crossed cheque) क्रॉस चेक. शुभ भावना-शुभ कामनावाला जो धनादेश आहे. तो बेअरर आहे. बेअरर चेक खात्यात जमा केला. तर त्याचे पैसे रोख मिळतात आणि क्रॉस केलेल्या धनादेशाचे पैसे खात्यात जमा होतात. **अलौकिक क्रॉस केलेले धनादेश तीन प्रकारचे आहे. १. संकल्प शक्तीचा धनादेश. २. श्रेष्ठतेचा (श्रेष्ठ कर्माचा) व दैवी संस्कारांचा धनादेश. ३. शब्दांचा धनादेश. शिवबाबा विचारतात, संकल्प शक्तीमध्ये काय विशेषता आणली? संकल्पांमध्ये जितकी विशेषता आणाल. तितकी त्या खात्यात जमा होईल** दूसरे, श्रेष्ठतेत काय नाविन्य आणले? रोज आपल्या खात्यात चेक करा म्हणजेच धनादेश जमा करा. जेव्हा व्यक्ती आपल्या खात्यात जमा करेल. तेव्हाच तर तो चेक करू शकेल की. खात्यात किती शिल्लक आहे? अशा प्रकारे मी श्रेष्ठतेमध्ये काय नाविन्य आणले, हे चेक करणे म्हणजेच धनादेश जमा करणे होय. जेव्हा आम्ही नवीन दुनिया स्थापन करीत आहोत आणि नवीन दुनियेत जाण्यासाठी तयारी करीत आहोत, तर आपल्यामध्ये काही तरी नाविन्य आले पाहिजे. जुने संस्कार काढून नवीन दैवी संस्कार भरत राहिले पाहिजे. हे चेक करा की आज आपण कोणते नवीन दैवी संस्कार भरले. तिसरे, बाबा सांगतात की शब्दांमध्ये माधुर्य, संतुष्टता आणि सरलता किती आहे, हे चेक करा.

अशाप्रकारे आपल्याला चारही प्रकारच्या मजेमध्ये राहून, रोज कर्मांच्या खात्यात सेवेचे धनादेश टाकून जमेचे खाते चेक करीत आनंद - मौजेमध्ये राहायचे आहे.

(भावानुवाद: ब्र.कु.मीनाक्षी, ठाणे-पू)

संपादकीय.....

स्वमान हा आत्म्याचा सन्मान,
देती स्वये शिव भगवान....

भारतातील ऋषी-मुनींनी केवळ हेच सांगितले होते की 'मी आत्मा आहे.' परंतु संगमयुगात जेव्हा परमात्मा 'शिव' पिता या सृष्टीवर अवतरित झाले तेव्हा त्यांनी हे ज्ञान दिले की तुम्ही किती महान आत्मा आहात; तुम्ही किती शक्तींनी सुसज्जित आहात, तुम्हाला कोणकोणते अधिकार प्राप्त आहेत व तुमचे महान कर्तव्य कोणते आहे. **त्यामुळे स्वमान अर्थात मी किती महान आत्मा आहे, हे जाणून त्याचे स्वरूप बनणे. आजवर ज्ञानमुरलीतून आपण अनेक स्वमान ऐकले. त्यानुसार त्याचे स्वरूप बनण्याचा यथाशक्ती प्रयत्नही केला. परंतु आता आवश्यकता आहे ती आपले जीवनच त्या स्वमानाचे स्वरूप बनविण्याची.** त्याद्वारेच आपली स्थिती सहजच बापसमान बनेल.

संगमी स्वमान सहज साधन ।
जेणे स्थिती होई बापसमान ।।

यासाठी सर्वप्रथम ही गोष्ट बुद्धीने स्वीकार करा की हा स्वमान मला स्वयं परमात्मा शिव पित्याने दिला आहे. समजा आपल्याला हा स्वमान दिला की तू पवित्रतेची देवता आहेस

तर सध्याच्या कलियुगी तमोप्रधान वातावरणात हा स्वमान स्वीकार करण्यासाठी आपली बुद्धी तयार होणार नाही. आपला विवेक आपल्याला सांगेल की तू आता पवित्रतेची देवता नाहीस, तुला असे बनायचे आहे, वस्तुत: हे जरी सत्य असले तरी जर आपण परमात्म्याने दिलेला हा स्वमान स्वीकार केला, तर त्याचे स्वरूप बनायला आपल्याला वेळ लागणार नाही. तसेच दिवसेंदिवस या स्वमानाचा नशा सूक्ष्म रूप घेत जाईल. आपले चिंतन व अभ्यास होत जाईल की मी पवित्रतेची देवता आहे. त्यामुळे कलियुगातील तामसी मनुष्यांची अपवित्रता आपल्याला स्पर्श देखील करू शकणार नाही. जोही आपल्याला पाहिल, त्याला पवित्रतेची प्रेरणा प्राप्त होईल. आपल्या दृष्टीने व संकल्पाने सर्वांना पवित्रतेची शक्ती मिळत जाईल. परिणामत: त्यांच्यातील आसुरी वृत्ती नष्ट होत जातील.

स्वमानाचा अभ्यास कसा कराल?

ज्ञानसागर शिवबाबांनी मुरलीतून आपल्याला अनेक स्वमान दिले आहेत. त्यातील तुम्हाला आवडणाऱ्या १५-२० स्वमानांची यादी तयार करा. (त्यासाठी वाचकांनी 'वाह रे मैं ब्राह्मण आत्मा!' हे पुस्तक पहावे.) त्यानंतर योगयुक्त स्थितीत स्थित होऊन, स्वत:ला विचारावे की यातील कुठला स्वमान मला अतिशय प्रिय वाटतो, ज्यामुळे मला विशेष खुशी, आनंद, उमंग-उत्साह, नशा व प्रेरणा प्राप्त होते. **अशाप्रकारे एखादा विशिष्ट स्वमान अति प्रिय वाटण्याचे मुख्य कारण म्हणजे मागील कल्पात देखील आपण याच स्वमानाचे स्वरूप बनलो होतो. या स्वमानाचा २१ दिवस अगदी मनापासून अभ्यास करा म्हणजे तुम्हाला अतिशय सुंदर अनुभव येतील. यासाठी दिवसभरात कमीत कमी ५ वेळा या स्वमानात स्थित होऊन, त्याचा नशा अनुभव करा. फलस्वरूप तुम्ही त्या स्वमानाचे स्वरूप बनाल.** हीच आपली स्थिती परमात्म प्रत्यक्षतेच्या काळात दुसऱ्यांनाही अनेक अनुभव करविण्यासाठी उपयुक्त ठरेल. मुख्य म्हणजे भक्तिकाळात देखील तोच स्वमान आपल्या पूज्य स्थितीचा आधार बनेल.

आपण हे जाणतो की पदवीच्या अभ्यासक्रमात तीन किंवा त्यापेक्षा अधिक विषय असतात. पदव्युत्तर अभ्यासक्रमात एकच विषय असतो व डॉक्टरेट पदवी प्राप्त करतांना, एखाद्या विषयातील एकाच टॉपिक वर संशोधन करून, प्रबंध लिहावा लागतो. तसेच काहीसे ज्ञानमार्गातही आहे. आपण जेव्हा एखाद्या स्वमानाचा दीर्घ काळ अभ्यास करून, त्याचे स्वरूप बनतो, तेव्हा आपण निर्विवादपणे आध्यात्मिक उन्नतीचे एक शिखर गाठलेले असते अथवा अध्यात्म शास्त्रात 'डॉक्टरेट' पदवी प्राप्त केलेली असते. तात्पर्य म्हणजे प्रत्येकाने अशाप्रकारे भिन्न-भिन्न स्वमानांचे स्वरूप बनून, सतत स्वत:ची तसेच दुसऱ्यांची उन्नती प्राप्त करीत रहावे. सारांशाने -

स्वमान उन्नतीचे साधन ।
तेणे होई विश्वकल्याण ।।

आपल्या माहितीसाठी काही स्वमान खाली नमूद केले आहेत. त्यातील जो स्वमान

आपल्याला अति प्रिय वाटत असेल, त्याचा अभ्यास अवश्य करावा.

- मी (आत्मा) मास्टर सर्वशक्तिवान आहे.
- मी (आत्मा) मास्टर पवित्रतेचा सूर्य आहे.
- मी (आत्मा) सभ्यतेची देवी वा देवता आहे.
- मी (आत्मा) साक्षात्कारमूर्त, इष्टदेव आहे.
- मी (आत्मा) दाता व वरदाता आहे.
- मी (आत्मा) कर्मयोगी फरिश्ता आहे.
- मी (आत्मा) विश्वाचा आधारमूर्त, उद्धारमूर्त आहे.
- मी (आत्मा) शिवशक्ती अवतार आहे.

या व्यतिरिक्त इतरही स्वमान जे आपल्याला अति प्रिय असतील, त्यांचा आपण अभ्यास करावा व त्या स्वमानाचे स्वरूप बनावे.

स्वमान करी अभिमानाचा विनाश

आपल्यातील देहाभिमान नष्ट करणे हे आपल्या आध्यात्मिक साधनेचे मुख्य लक्ष्य आहे. जर साधकातील अभिमान नष्ट झाला नाही तर त्याच्या साधनेचे बळ नष्ट होऊन जाते. परिणामत: त्यात आध्यात्मिकता वा दिव्यता दिसून येत नाही. स्वमानात स्थित होणे हा आत्म्याचा शुद्ध नशा आहे. हा शुद्ध नशा जितका वाढत जाईल व जितके आपण स्वमानाचे स्वरूप बनत जाऊ, तेवढा अभिमान आपोआपच कमी होत जाईल. स्वमानात स्थित होऊन जेव्हा आपण दुसऱ्याशी वार्तालाप करतो तेव्हा त्याचा देखील अभिमान नष्ट होत जातो. जेव्हा एखादा मोठा विद्वान त्याच्या बुद्धीच्या अभिमानामुळे एखादे सत्य स्वीकार करायला तयार नसतो, तेव्हा तो आपल्या स्वमानामुळे तो स्वत:ला अल्पज्ञ अनुभव करतो. सदैव हे लक्षात ठेवा-

स्वमान हा सत्याचा प्रकाश ।
करी अभिमानाचा विनाश ।।

स्वमानाने सन्मानाची प्राप्ती

कित्येक जण यामुळे चिंतित असतात की त्यांना कोणी सन्मान देत नाही. वास्तविक मनुष्य आपल्या स्वमानाला विसरल्यामुळेच, त्याने आपला सन्मान गमवला आहे. आज लहान, मोठ्यांना सन्मान देत नाहीत. विद्यार्थी आपल्या आध्यापकांचा सन्मान करीत नाहीत. यात दोष मोठ्यांचा आहे. ते आपल्या स्वमानाला विसरून, व्यसनांचे गुलाम बनले आहेत. परिणामत: समाजात आपला सन्मान गमवून बसले. स्वमानात स्थित असणाऱ्या माणसाच्या मागे सन्मान हा सावलीप्रमाणे येत असतो. त्यांना तर स्वयं भगवान सन्मान देत आहे, यापुढे मनुष्यांची काय गोष्ट आहे? त्यामुळे सन्मानाला इतरत्र कुठे शोधण्यापेक्षा, स्वत: स्वमानात स्थित राहा.

स्वमानाने सदा सन्मानाची प्राप्ती।
स्वये शिवप्रभु गाती त्याची महती।।

स्वमान हा कलियुगी प्रभावापासून मुक्त ठेवतो

आज प्रत्येक मनुष्यात्मा कलियुगाच्या प्रभावाखाली वावरत आहे. परंतु हजारो पतित आत्म्यांच्या मध्ये जर आपण या स्वमानात स्थित राहिलो की मी पवित्र आत्मा आहे; महान आत्मा आहे, केवळ माझ्यावर परमात्मा शिव पित्याची नजर आहे तर आपल्याला कुठलीही पतित वायब्रेशन (प्रकंपन) स्पर्श देखील करू शकणार नाहीत. त्यामुळे कलियुगी प्रभावापासून तसेच दु:ख, अशांती व आपदा यापासून मुक्त रहाण्यासाठी सदैव कुठल्यातरी श्रेष्ठ स्वमानात स्थित रहा. अशाप्रकारे जर आपण श्रेष्ठ स्वमानात स्थित राहिलो तर दुसरे लोकही आपल्या आज्ञेचे पालन करतील. आपल्याला सर्वांकडून सहयोग प्राप्त होईल. फलस्वरूप आपली सर्व कामे सहज पूर्ण होतील. लोकांकडून आपल्याला उत्स्फूर्त सहयोग प्राप्त होत गेल्याने, आपल्यात राजाई (राजकुलोचित) संस्कार निर्माण होत जातील. आपला स्वमान आपल्याला प्रत्यक्ष बाप समान बनवेल. सदैव लक्षात ठेवा-

स्वमान हा अमृताचा कुंभ ।
तोडी जो कलियुगी भवबंध ।।

स्वमानधारीचे मुख्य लक्षण

स्वमानधारी आत्म्याचे मुख्य लक्षण हे असेल की तो सर्वांना सन्मान देईल. जितका स्वमानधारी तितकाच तो निर्मान (निरंहकारी) व सर्वांचा स्नेही असेल. जसा तो शिवबाबांना प्रिय असेल तसाच तो सर्वांना देखील प्रिय असेल. पिताश्री ब्रह्माबाबांनी जसा लहानांपासून मोठ्यापर्यंत सर्वांना स्वमान दिला. कन्यांना 'शिवशक्ती' स्वरूपाचा स्वमान दिला. प्रवृत्तीत राहणाऱ्यांना महात्मा वा जगत्गुरू पेक्षाही उच्च स्वमान दिला 'पर-वृत्तीत राहणारे,' महात्म्यांचे देखील मस्तक झुकवणारे बनविले. जे बुजुर्ग आहेत, त्यांना ब्रह्माबाबांचे 'हमजिन्स' अनुभवी आत्मे, असा स्वमान दिला. तसाच स्वमानधारी देखील सर्व आत्म्यांना स्वमानाने पाहिल. केवळ पाहणारच नाही तर स्वमानाने त्यांच्या संबंध-संपर्कात येईल. कारण स्वमान हा देह-अभिमान मिटविणारा आहे. त्यामुळे लक्षात ठेवा, स्वमान हा देह-अभिमान मिटविण्याचे सहज साधन आहे. तसेच स्वमान हा स्वानंदाचा ठेवा आहे. म्हणूनच-

स्वमान द्यावा, स्वमान घ्यावा ।
स्वमान हा स्वानंदाचा ठेवा ।।

आता परमात्म प्रत्यक्षतेचा समय अति जवळ येत आहे. अशावेळी जे स्वमानाचा अभ्यास करून, त्याचे प्रत्यक्ष स्वरूप बनतील; तेच परमात्म प्रत्यक्षतेसाठी निमित्त बनतील. त्यामुळे आपण प्रत्येकाने आपल्या आवडत्या स्वमानाचे स्वरूप बनावे, हीच मंगलकामना!

- ब्रह्माकुमार शिवाजी

स्वये शिवबाबा वदती...

स्वये शिवबाबा वदती,
सत्य गीता ज्ञान देती ।।धृ।।

कलियुगाच्या अंतिम समयी ।
धर्म-ग्लानी ती विश्वात होई ।
युग पुरुषोत्तम कल्याणकारी ।
संगमयुगी ब्रह्मा तनाचा आधार,
शिवबाबा घेती ।।१।।

सत्ययुगामध्ये पावन भारत ।
कले-कलेने तो झाला पतित ।
म्हणून आज दुःखी भारत ।
त्याला पुन्हा पावन करण्या,
शिव आले भूवरती ।।२।।

आज मानव होऊन विकारी ।
वन-वन भटके बनून भिकारी ।
तिर्थी, मंदिरी जाऊन पुकारी ।
मुक्तीचे वरदान मागण्या,
भक्ती तव करती ।।३।।

देवतातुल्य तो होता मानव ।
सोळा कलांनी पवित्र पावन ।
जन्म चौऱ्यांशीचा फेरा मारून ।
विनाशाच्या उंबरठ्यावरी,
प्रभु पित्याला पुकारती ।।४।।

आता परिवर्तन करी स्वतःचे ।
नित्य सेवन करी ज्ञान अमृताचे ।
योगाग्निने भस्म करी तू पापांचे ।
तव जीवन सफल होई,
वचन हे शिवबाबा देती ।।५।।

– ब्र. कु. मारुतीभाई, घोडबंदर (ठाणे)

ज्ञानाची गाडी
(बालगीत)

झुक झुक झुक झुक, ज्ञानाची गाडी ।
शांतीची वलय, दुनियेत काढी ।
बाबांची महिमा, गाऊ या ।
बाबांच्या गावाला जाऊया, जाऊया ।।१।।

बाबा माझा जादूगार ।
ज्ञान देतो हजारो बार ।
हसत पुरुषार्थ करूया ।
बाबांच्या गावाला जाऊया, जाऊया ।।२।।

योगबळाची बांधू गाठ ।
स्वर्गाची ती दावी वाट ।
पवित्रतेला लेऊया ।
बाबांच्या गावाला जाऊया, जाऊया ।।३।।

ब्रह्मा माता आहे महान ।
शिकवते ती बाबांच ज्ञान ।
स्मरण तीचे ठेऊया ।
बाबांच्या गावाला जाऊया, जाऊया ।।४।।

गीतांजली ही आहे लहान ।
परंतु भाव आहे महान ।
बाबांना समर्पित करूया ।
बाबांच्या गावाला जाऊया, जाऊया ।।५।।

ब्र.कु. अलका विंचू, खेड (रत्नागिरी)

चिंतन बदला तर परिस्थिती बदलेल

– ब्र. कु. भगवानभाई, शांतिवन, आबूरोड

मानव जीवनात काही ना काही परिस्थिती तर येतच असते. जेव्हा परिस्थिती विपरीत असते. तेव्हा आपण त्या परिस्थितीची पुन्हा-पुन्हा आठवण करून, अधिक दु:खी होत असतो. त्याबरोबर त्या परिस्थितीचे चिंतन करून, वर्तमान वेळ सुद्धा वाया घालवत असतो. तसेच ती परिस्थिती निर्माण करणाऱ्याविषयी, मनात वारंवार राग, द्वेष, घृणा, अशुभ भावना निर्माण करतो. या नकारात्मक विचारांमुळे मनात तणाव निर्माण होतो. यातूनच पुढे शारीरिक आजार उद्‌भवतात. म्हणूनच विपरीत परिस्थितीत सुद्धा मनाला स्थिर ठेऊन, सकारात्मक चिंतन करण्याची गरज आहे. **सदैव हे लक्षात ठेवा की सकारात्मक चिंतन परिस्थितीला बदलू शकते. सकारात्मक चिंतनामुळे आपले मनोबल वाढते व ज्याचे मनोबल मजबूत आहे. तोच परिस्थितीवर सहज विजय मिळवू शकतो.**

विचारांप्रमाणेच परिस्थिती निर्माण होते

तसे पाहिले तर सर्वांची हीच अपेक्षा असते की आपल्या जीवनात सदैव सुखमय परिस्थिती यावी. कधीही दु:खमय परिस्थिती येऊ नये. परंतु असे घडण्यासाठी आपल्याला नेहमी सकारात्मक विचार करण्याची गरज आहे. **हे लक्षात ठेवा की आपल्या मनामध्ये ज्या प्रकारचे चिंतन अथवा विचार चालतात. तशीच परिस्थिती निर्माण होत असते. आपल्या विचारांमुळेच परिस्थिती सुद्धा आकर्षित होते.** परंतु आपण आपल्या विचारांकडे फारसे लक्ष देत नाही. कधी-कधी व्यर्थ वा नकारात्मक विचारसुद्धा आपण करतो. त्यामुळेच आपल्या जीवनामध्ये विपरीत परिस्थिती निर्माण होते. म्हणूनच आपल्या मनामध्ये नेहमी शुभविचार, श्रेष्ठ विचार, सकारात्मक विचारांची निर्मिती करीत रहावे. फलस्वरूप आपले कर्म सुद्धा शुभ होत राहतील आणि शुभ कर्मामुळे परिस्थिती अर्थातच शुभ निर्माण होईल.

चांगली परिस्थिती किंवा वाईट परिस्थिती निर्माण करणारा दुसरा कोणी नसून, आपले मनच असते. म्हणूनच म्हटले जाते, मनच आपला खरा मित्र आहे. तसेच खरा शत्रू देखील आहे. जेव्हा मनामध्ये सकारात्मक विचार चालतात तेव्हा मन आपला मित्र आहे. याउलट जेव्हा मनामध्ये नकारात्मक विचार चालतात, तेव्हा ते आपला शत्रू आहे. तात्पर्य म्हणजे आपण मनाला जिंकले तर जग जिंकण्यासारखे आहे. परंतु आपण मनाला सुधारण्याऐवजी परिस्थितीला बदलण्याचा किंवा दुसऱ्यांना बदलण्याचा प्रयत्न करीत असतो. याविषयी एक उद्‌बोधक कथा याठिकाणी नमूद कराविशी वाटते.

एकदा एका राजाची तब्येत बिघडली. तेव्हा अनेक वैद्य त्यावर उपाय सांगू लागले. एका वैद्याने सांगितले की तुम्ही हिरव्या गवतामध्ये सकाळ-संध्याकाळ फिरत जा. तसेच जर तुमच्या रूममध्ये हिरवा गालीचा वापराल किंवा हिरव्या रंगाचे पडदे लावाल तर तुमची तब्येत अधिक लवकर सुधारेल.

त्यानुसार सर्व व्यवस्था करण्यात आली. राजा जेव्हा फिरायला जात तेव्हा रस्त्यावर सुद्धा हिरव्या चटया अंथरल्या जात. इतकंच नव्हे तर संपूर्ण महालाला हिरवा रंग देण्यात आला. राजा जेथे जाणार असेल तेथेही हिरवा रंग द्यायला सुरुवात झाली. पाहता पाहता सर्व शहरच 'ग्रीन सिटी' मध्ये रूपांतरित झाले. एकदा शेजारच्या

सदैव हे लक्षात ठेवा की सकारात्मक चिंतन परिस्थितीला बदलू शकते. सकारात्मक चिंतनामुळे आपले मनोबल वाढते व ज्याचे मनोबल मजबूत आहे. तोच परिस्थितीवर सहज विजय मिळवू शकतो.

राज्याचा प्रधान त्या शहरात राजाला भेटण्यासाठी आला. तेव्हा त्याला सर्व शहरच हिरवे पाहायला मिळाले. तसेच राजाची तब्येत लवकर बरी व्हावी, यासाठी हे सर्व केल्याचेही त्याला समजले. तेव्हा तो प्रधान राजाला म्हणाला की तुम्हाला जर सर्वच गोष्टी हिरव्या बघायच्या असतील तर तुम्ही हिरव्या रंगाचा चष्मा लावा. तेव्हा राजाला ही गोष्ट पटली. त्यानुसार राजाने हिरवा चष्मा लावल्यावर त्याला सर्व काही हिरवे दिसू लागले. **तात्पर्य म्हणजे जर आपला चष्मा सकारात्मक विचारांचा असेल तर सर्व प्रकारची परिस्थिती आपल्याला चांगली दिसू लागेल. आपण कुठपर्यंत इतरांना बदलत राहू. परंतु जर आपण स्वत:ला बदलले तर आपल्याला संपूर्ण जग बदलल्यासारखे वाटेल.** सारांशाने आपल्या विचारांना बदला अथवा चिंतन बदला तर परिस्थिती हमखास बदलेल.

जसे बीज तसे फळ

ज्याप्रमाणे जमिनीत बीज पेरले जाते. त्याला पाणी दिले जाते. अंकुरीत झाल्यावर त्याचे रक्षण करून, त्याला खत-पाणी दिल्याने त्याचा वृक्ष बनतो. कालांतराने त्या वृक्षाला फळे येतात. त्याचप्रमाणे आपल्या मनातील विचार एखाद्या बीजाप्रमाणे असतात. आपल्या मनरूपी शेतीमध्ये आपण ते पेरतो. अर्थात विचारांचे मनात बीजारोपण करतो. त्या विचारांना वारंवार स्मृतीत आणून, आपण जणू त्यांना खत-पाणी देतो. कालांतराने त्याला परिस्थिती रूपी चांगली अथवा वाईट फळे येतात. उदाहरणार्थ एखादा गरीब मुलगा जेव्हा शाळेत जाऊ लागतो. तेव्हा तो आपल्या मनाशी ठरवतो की मला शिक्षण घेऊन, खूप मोठ व्हायचे आहे. माझी परिस्थिती मला बदलायची आहे. या एका विचाराचे मनात बीजारोपण केल्यावर, त्याला चांगली फळे येईपर्यंत तो त्या बीजाची जोपासना करीत असतो. सतत मन लावून अभ्यास करत असतो. कालांतराने त्याला खूप चांगली नोकरी लागते व त्याची परिस्थिती बदलते. तात्पर्य म्हणजे मनात नेहमी सकारात्मक विचारांचे बीजारोपण करा तर जीवनात सुख-शांती रूपी फळे अवश्य खायला मिळतील.

मनाला शक्तिशाली बनवा तर परिस्थिती रूपी काटे बोचणार नाहीत.

आपण जेव्हा यात्रेला जातो किंवा चालत-फिरत असतो तेव्हा रस्त्यामध्ये अनेक काटे, छोटे-मोठे दगड असतातच. परंतु ते वेचून टाकण्यामध्ये आपण आपला वेळ वाया घालवत नाही किंवा रस्त्यावरील काटे पाहून आपण हा प्रश्न करीत नाही की हे कोणी टाकले? का टाकले? आपण या गोष्टी गृहीत धरतो की यात्रा करतांना काटे, दगड, धोंडे, ऊन-पाऊस हे सर्व अडथळे असणारच. त्यापासून आपले रक्षण करण्यासाठी आवश्यक ती साधने (बूट, रेनकोट, छत्री, गॉगल, टोपी इ.) आपण बरोबर घेतो. इतरांना वा प्रकृतीला आपण दोष देत बसत नाही. त्याचप्रमाणे आपल्या जीवनरूपी यात्रेत देखील विपरीत परिस्थितीरूपी काटे, समस्या, विघ्न हे येतच राहणार. त्यापासून आपले रक्षण व्हावे, यासाठी आपल्या मनाला सशक्त बनविण्याची गरज आहे. **म्हणूनच आपल्या मनाला रोज सकारात्मक विचारांनी भरपूर करा. सशक्त वा शक्तिशाली मन विपरीत परिस्थितीवर सहज मात करू शकते. त्यासाठी रोज नियमितपणे राजयोगाचा अभ्यास व ज्ञानमुरलीचे श्रवण या दोन गोष्टी करा.**

मनाला वाहत्या गंगेप्रमाणे बनवा

आपल्या जीवनात ज्यांनी आपल्याला ठेच पोचवली किंवा ज्या परिस्थितीने आपल्याला धोका दिला; त्याविषयी आपण वारंवार विचार करतो. मनाला त्याची पुन्हा-पुन्हा आठवण येते. परंतु लक्षात ठेवा की त्यामुळे आपली जीवन यात्रा एकाच ठिकाणी थांबल्यासारखी होते. जसे पाणी हे जर एकाच ठिकाणी साचून राहिले तर त्याचे डबके बनते. ते पिण्यायोग्य रहात नाही. त्यात किडे पडतात, दुर्गंधी येऊ लागते. तसेच आपण सुद्धा भूतकाळातील विपरीत परिस्थितींची आठवण करीत बसतो. तेव्हा आपले मनदेखील दुर्बल, सामर्थ्यहीन बनते. त्यामुळे जीवनातील कटू प्रसंगांना विसरा. अशा गोष्टींची पुन्हा-पुन्हा आठवण करून, आपले वर्तमान व भविष्य खराब करू नका. ज्या व्यक्तिंनी आपल्याला भूतकाळात दु:ख दिले असेल, त्यांना मोठ्या मनाने माफ करा. त्याचबरोबर आपले जर काही चुकले असेल तर मनोमनी त्यांची माफी मागा. म्हणजे आपल्या मनातील विचारांचा प्रवाह पुन्हा वाहत्या गंगेप्रमाणे निर्मळ बनेल. फलस्वरूप आपल्या मनमंदिरात परमात्मा शिव पिता निवास करेल.

जैसी गंगा वाहे, ऐसे ज्याचे मन ।
भगवंत जाण, तयेजवळी ।।

जीवनाला एक नाटक समजा

ज्याप्रमाणे नाटकात अनेक प्रकारची पात्रे असतात, उदा. नायक, खलनायक, नोकर-चाकर, चोर-दरोडेखोर इ. या सर्वांशिवाय नाटकच तयार होणार नाही. त्याचप्रमाणे ही सृष्टीदेखील एक रंगमंच आहे. त्यातील नाटकात आपलीदेखील महत्त्वपूर्ण भूमिका आहे. ती भूमिका

बजावत असताना चांगले-वाईट कलाकार तसेच चांगली-वाईट परिस्थिती आपल्यापुढे तर येतच रहाणार. परंतु आपण या सर्व गोष्टींचा स्वीकार करून, त्यापासून काही ना काही बोध घेऊन, आपल्या जीवनात सदैव उन्नती करत राहिले पाहिजे. **सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या नाटकात सर्व कलाकार हे निर्दोष आहेत. ते केवळ त्यांची भूमिका (चांगली-वाईट) बजावत आहेत, हे लक्षात ठेवा. म्हणजे कुठल्याही कलाकाराविषयी आपल्या मनात दुराग्रह निर्माण होणार नाही. तसेच हे नाटक साक्षी द्रष्टा होऊन पाहा म्हणजे सदैव आनंदमय स्थितीचा अनुभव कराल.**

विपरीत परिस्थितीला कडू औषध समजून त्याचा स्वीकार करा

जसे एखादी औषध कडू असले तरी ते रोगमुक्त होण्यासाठी आवश्यक आहे; असे समजून आपण ते घेतो. तसेच विपरीत परिस्थिती कडू औषधाप्रमाणे असली तरी सुद्धा आपण तिचा स्वीकार केला पाहिजे. अशी परिस्थिती आपल्यासाठी जीवनदायिनी सुद्धा बनू शकते. त्याचबरोबर हे ही लक्षात ठेवा की जीवनातील कडू परिस्थितीचा एखाद्या गोड मिठाईप्रमाणे स्वीकार केला तरच आपली सकारात्मकता कायम टिकून राहू शकेल. **जसे कडू पदार्थ उदा. कार्ले, मेथी इत्यादींचे सेवन केल्याने शारीरिक स्वास्थ्य चांगले राहते. तसेच जीवनातील कटू प्रसंगांना वा परिस्थितीला पचवल्याने मानसिक स्वास्थ्य चांगले राहते.**

आपला स्वभाव पाषाणासारखा नव्हे तर पाण्यासारखा बनवा

आपला स्वभाव हा पाषाणासारखा नव्हे तर पाण्यासारखा निर्मळ असावा. पाणी कोणत्याही परिस्थितीत आपला मार्ग काढत असते. पाणी आपल्या प्रवाहात जर मोठा दगड आला तरी त्या दगडाचे पाय धुवून, दुसऱ्या मार्गाने पुढे निघून जाते. ते मार्गातील अडथळा दूर होण्याची वाट पाहत नाही. आपणही पाण्यसारखे नेहमी पुढे जात राहायचे. परिस्थितीला पाहून जो थांबला, तो संपला. त्यामुळे जीवनात दुसऱ्यांशी व्यवहार करतांना पाण्याप्रमाणे स्वत:ला बदला. पाणी जसे कोणत्याही भांड्यात टाकले तरी ते भांड्याचा आकार घेते. कशातही ते मिसळता येते. त्याचप्रमाणे आपण सुद्धा इतरांसोबत मिळून मिसळून वागले पाहिजे. सदैव लक्षात ठेवा की परिस्थितीचे आपण स्वामी आहोत, निर्माता आहोत. त्यामुळे परिस्थितीला आपल्या अधीन ठेवा. जो परिस्थितीप्रमाणे स्वत: वाहत जातो, तो परिस्थितीचा गुलाम आहे. याउलट जो स्वस्थितीमध्ये टिकून राहतो, त्याला परिस्थिती काहीही करू शकत नाही.

वर्तमान समयी आपली स्वस्थिती मजबूत ठेवण्यासाठी प्रामुख्याने तीन गोष्टींकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

- **राजयोगाचा सतत अभ्यास**
- **सदैव सकारात्मक चिंतन**
- **ईश्वरीय श्रीमताचे पालन.**

ज्याची आत्मिक स्थिती मजबूत आहे तोच स्वत:साठी तसेच दुसऱ्यांसाठी विघ्नविनाशक बनतो. अशारितीने सकारात्मक चिंतनाद्वारे आपल्या जीवनातील लहान-मोठ्या परिस्थितीला सहज बदलता येते. असा साधक अनेकांसाठी मार्गदर्शक व आदर्श शिक्षक बनू शकतो.

वाचकांशी हितगुज

- **अमृतकुंभ व अमृतकलश या दोन्ही द्वैमासिकांचा विचार करता, सन २०१७-१८ हे मराठी द्वैमासिकाचे ३३ वे वर्ष आहे. त्यानिमित्त वाचकांकडून अनेक सदिच्छापर संदेश प्राप्त झाले आहेत. त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार! आजवर वाचकांनी अतिशय उत्तम प्रतिसाद दिला. यापुढेही तो असाच मिळत राहील, अशी खात्री आहे.**
- **काही सेवाकेंद्रांकडून अमृतकुंभची सन २०१७-१८ ची मागणी अद्याप प्राप्त झाली नसल्याने, संबंधित टीचर भगिनींनी ती फोन, ई-मेल वा स्पीड पोस्टद्वारे त्वरीत कळवावी. तसेच अधिकाधिक सभासद संख्या वाढविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवावे व ईश्वरीय सेवा वृद्धीगत करण्यासाठी सहयोग द्यावा.**
- **मुख्य म्हणजे सन २०१७-१८ ची वर्गणी मागच्या इतकीच ठेवण्यात आली आहे. त्यामुळे वार्षिक वर्गणी रु. ६५/- व आजीव सभासद वर्गणी रु. १३००/- राहील. डिमांड ड्राफ्ट पाठवितांना तो 'अमृतकुंभ, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय' या नावाने पाठवावा.**
- **आपले काही विशेष अनुभव, लेख, कविता तसेच अमृतकुंभविषयी काही सूचना असल्यास त्या अवश्य कळवाव्यात.**

- प्रकाशक, अमृतकुंभ



नात्यांचा हा खेळ, आहे किती गोड..

– ब्र.कु. अनुराधा खोत, पुणे

अगदी सुरुवातीलाच आपल्याला नवीन कळणारी गोष्ट म्हणजे आपल्याला आणखी दोन पिता आहेत. आपले जन्मदाते वडील हे लौकिक पिता, ब्रह्माबाबा झाले अलौकिक पिता अन् परमात्मा शिव हे परमपिता आहेत.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातली विद्यार्थिनी झाले आणि नवनव्या, चकित करणाऱ्या गोष्टींचं भांडारच खुले झाले माझ्यापुढे! त्यातली एक गोष्ट होती-ती परमेश्वराशी सारी नाती जोडण्याची. हे जे नातं जोडणं आहे. ते काही सोपं नाही. हे प्रथम लक्षात आलं. कोणाकोणाला तर ते फारच कठीण म्हणजे अशक्यप्रायच वाटतं, असेही दिसून आले.

अगदी सुरुवातीलाच आपल्याला नवीन कळणारी गोष्ट म्हणजे आपल्याला आणखी दोन पिता आहेत. आपले जन्मदाते वडील हे लौकिक पिता, ब्रह्माबाबा झाले अलौकिक पिता अन् परमात्मा शिव हे परमपिता आहेत. हे कळतंय तोच आपल्याला समजावले जाते की, ब्रह्माबाबा हे आपली 'आई' सुद्धा आहेत. कारण त्यांच्या मुखाद्वारे आपला अर्थात संगमयुगी ब्राह्मण जन्म झाला! आपण मुखवंशावली ब्राह्मण आहोत. बरं! तेवढ्यात आपली ओळख होते-मम्मांशी. मम्मा म्हणजे जगदंबा सरस्वती. सोळा वर्षांची ही राधा नामक मुलगी ज्ञानात आली, समर्पित झाली आणि पाहता-पाहता यज्ञमाता बनली. अल्लड मुलीची धीरगंभीर प्रौढबुद्धी, शांत आई बनली. संपूर्ण परिवाराची आई. वाढत जाणाऱ्या ब्राह्मण परिवाराची आई. पुरुषार्थाने ती आतून मोठी, मजबूत, उंच होत गेली. भराभर प्रगती करीत, कर्मातीत होऊन संपूर्ण बनली. पण तिचा कार्यभाग काहीसा वेगळा. साकार रूपात असताना ज्ञान-योग-धारणा-सेवा या चारही प्रकारे समतोल साधला. अर्ध्या वयातच संपूर्णता साधून रात्रंदिवस कार्यरत राहिली. सन १९६५ मध्ये देह सोडला. **अशी ब्रह्माची 'बेटी' ही सरस्वती-जगदंबा आणि या 'ब्राह्मण' परिवाराची आई. तर ब्रह्माबाबा हे पित्याच्या जागी. पुन्हा 'बापदादा' हे जेव्हा एकत्र-एकरूप असतात, तेव्हा 'बाप' म्हणजे 'ब्रह्माबाबा' अन् दादा म्हणजे आजोबा, हे शिवबाबा! किंवा असंही म्हणू शकतो आपण की दादा लेखराज उर्फ ब्रह्माबाबा हे दादा म्हणजे मोठा भाऊ अन् बाप म्हणजे शिवबाबा! आहे ना सगळी गंमतच? कशी एकात एक मिसळली आहेत नाती!** पुन्हा 'मुरली' मध्ये शिवबाबा सांगतात, ''हा ब्रह्मा आहे ग्रेट ग्रेट ग्रेट ग्रॅण्डफादर' मग शिवबाबा? सुप्रीम फादर! तो तर साऱ्याच मनुष्यात्म्यांचा परमपिता-मानवसृष्टीचं महाबीज!

मी लहानपणी महाभारत वाचण्याचा प्रयत्न

केला. तेव्हा प्रारंभीच त्यातील कुरुवंशातल्या राजांची नाती समजून घेताना दमछाक झाली होती! परंतु आता या ज्ञानातली ही नातीगोती समजून घेताना लक्षात आलं की, आपण आधी देह बाजूला ठेऊन, आत्मरूपात प्रवेशणं हीच पहिली अट आहे. आपण प्रकाशस्वरूप, ज्योतिर्बिंदू स्वरूप आत्मा. परमात्मा ही तसाच. ब्रह्माबाबा हे आता संपूर्ण फरिश्ता-सूक्ष्म प्रकाशमय देहात आहेत. हे सारं पंचतत्त्वात्मक देहापलीकडचं आहे. हे लक्षात घेतलं तर मग सारं सहज सोपं होऊन जाते.

एकदा या ज्ञानात आलेलं एक जोडपं आणि आम्ही दोन मैत्रिणी असे प्रवासात होतो. चर्चा सुरू होती ती याच विषयाची. बाबांशी सर्व नाती जोडायची - पण कशी? उदाहरणार्थ, शिवबाबाला - आपला मुलगा मानायचं! अं? अशक्य! अशक्य! आमच्या त्या मैत्रिणीला बहुतेक त्यांचा स्वत:चा हट्टी, आपलं तेच खरं करणारा, चाळीशीचा मिशाळ मुलगा आठवला बहुतेक! जानकीदादी म्हणतात, ''सखा बनाओ ना!'' तसं सखा म्हणा ना! मी म्हटलं तर त्या दुसऱ्या बाईंचा चेहरा गोरामोरा, संकोचलेला. नवरा शेजारी बसलेला अन् म्हणे 'सखा म्हणा!' छे छे अशक्य! म्हणजे त्यांच्या मनात 'सखा' या शब्दाचा मराठी भावगीतातला रूढ अर्थ रुंजी घालत होता. सखा म्हणजे ज्याच्यापाशी आपण आपली सुखदु:ख सांगू शकतो, 'आत्मनिवेदन' करू शकतो, जो संकटकाळी आपल्या मदतीला धावून येईल अशी आपली खात्री असते तो, असा काही विचारच डोक्यात नव्हता. सखा म्हणजे.. प्रियकर? छे छे अशक्य - अशक्य! मग वडील? आई? म्हणतोच ना आपण प्रत्येक वेळी आरतीनंतर - त्वमेव माता पिता त्वमेव... पण नाही. वडील म्हटलं की वडिलांचा रागीटपणा आठवतो. आई म्हटलं तर असंच काही..... माझ्या लक्षात आलं त्यांची काय कुचंबणा झालीय ती. ते असं की, प्रत्येक वेळी नात्याचा उच्चार केला की, त्या स्वत:ही देहात अडकलेल्या आणि इतर नात्यांचा ही विचार करताना त्या त्या देहधारी व्यक्तीच त्यांच्या डोळ्यांपुढे येत होत्या! मग कसं जमायचं हो? **कारण इथे निराकार आत्म्याने निराकार परमात्म्याशी प्रत्येक नाते कल्पनेनं जोडून, त्याचा आनंद घ्यायचा आहे. देह, देहांची नातीगोती, हे सगळं पृथ्वीवरचं विसरायचंच आहे. ही पूर्वअट पाळली गेली नाही. म्हणून त्यांना ते सारं अशक्यप्राय वाटत होतं.**

हा प्रकार सूक्ष्म आहे. भौतिकतेच्या पलीकडचा आहे. आत्मिक आहे. हे आधी लक्षात घेणं आवश्यक आहे. तर आणि तरंच हा जो नात्यांचा गोड खेळ इथे खेळायचा आहे. तो खेळता येतो.

आपली आत्म्यांची अधोगती चालू झाली, तीच मुळी देहभानात आल्यामुळे. देहाला जसजसे 'स्व' अर्थात 'मी' मानत आलो, तसतसे अहंकार-विकारांना बळी पडत गेलो. तेव्हा या देहापासून 'स्व' ला वेगळं करण्याचीच खरी मेहनत आहे. म्हणून देह, देहसंबंधित वस्तू, नाती, यापासून मनानं अलिप्त होत जायचं. म्हणजे त्याविषयी वैराग्य आलं पाहिजे. ते वैराग्य हा पाया, परंतु रूक्षता नाही. तर मन भावनेनं रसभरीत हवं. कारण हा निवृत्तीमार्ग नव्हे तर पवित्र प्रवृत्तीमार्ग आहे. हे ही ध्यानात ठेवायचं. समतोल हवा.

देहापासून अलिप्त होण्यासाठी रोज देहाच्या पिंजऱ्यातून सुटण्याचा सराव काही वेळ करायचाच. सतत साकारातून निराकार, निराकारातून फरिश्तारूपात, पुन्हा साकारी असं होण्याचा आत्मिक व्यायाम करत राहायचं ही बाबांची शिकवण आहे. यामुळे आपल्याला अंतिम घडीला त्रास होणार नाही. या जगाचा मोह सुटेल. शेवटच्या क्षणी बाबांचीच आठवण येईल. हा क्षणार्धात 'पोशाख' बदलण्याचा जो सराव आहे तो एक सुंदर, सकारात्मक असा अनुभव आहे आणि लक्षात घ्यायचं की हा अनुभव केवळ संगमयुगातच मिळू शकतो. इतर कुठल्याही वेळी नाही. हे एकरस होण्याचं अद्भुत सुख केवळ

आपली आत्म्यांची अधोगती चालू झाली, तीच मुळी देहभानात आल्यामुळे. देहाला जसजसे 'स्व' अर्थात 'मी' मानत आलो, तसतसे अहंकार-विकारांना बळी पडत गेलो. तेव्हा या देहापासून 'स्व' ला वेगळं करण्याचीच खरी मेहनत आहे. म्हणून देह, देहसंबंधित वस्तू, नाती, यांपासून मनानं अलिप्त होत जायचं.

आपला (त्याच्या लाडक्या मुलांचाच) भाग्ययोग!

या कलियुगात आज जगातली माणसं किती विविध कारणांनी दु:खी आहेत. त्यातलं एक मोठं कारण एकटेपणाचं. ते एकटेपणाचं दु:ख, बाबांशी नातं जोडलं की संपून जातं. बाबा तर बहुरूपी! आणि आपण त्यांची संतान ही त्याच्यासारखीच तेजाचे बिंदु. मग नातं जुळायला काय उशीर? तो आपला शिक्षक, सद्गुरू, आहेच. हवं तेव्हा साजण आहे. आपल्याला गरज भासेल, तेव्हा तो वैद्यराज होतो. सर्जन होतो, तो 'धर्मराज' आहे; पण म्हणून त्याला घाबरलं पाहिजे, असं थोडंच आहे? एकदा आपल्या वरिष्ठ भाईंनी ब्र.कु. करुणाभाईंनी सांगितले तसं आपणच एवढं मजबूत व्हायचं की धर्मराजानच 'सलाम' भरावा. 'शाबाश बच्चे!' म्हणावं. तो मार्गदर्शक तर आहेच, आणि निरहंकारी तर किती! स्वत:ला आम्हा आत्म्यांचा मळ धुणारा 'धोबी' म्हणवतो. 'ओबीडिअंट सर्वंट' म्हणवतो. नम्रता शिकावी तर त्याच्याचकडून; पुन्हा प्रेमळ तरी किती प्रेमसागरच ना आहे तो! आपण किती सहजपणे नावं ठेवतो, कुणाविषयी तिरस्कारानं बोलतो. पण तो बजावतो, 'किसी की भी घृणा नहीं करना, नहीं तो डण्डे खाने पडेंगे!' चुकीला क्षमा नाही हे तर त्याच्या न्यायीपणाला शोभणारंच आहे. सर्वांना समान न्याय आहे इथं.

...तर पुन्हा एकदा, आपण त्याच्याशी आईचं नातं जोडून, त्याला आपलं 'बाळ' बनवण्याचं उदाहरण घेऊ या.

आत्मरूपात या, परमधामात जा नि पहा-किती तेजस्वी, किती दिव्यगुणी, किती सुंदर रंगांनी नटलेलं, लावण्यस्वरूप बाळ आहे हे. पुन्हा तुमच्याकडून ते ना सेवा घेतं, ना तुम्हाला त्रास देतं, ना जागरणं घडवतं. केवळ आनंद-सुख-प्रेम देणारं बाळ आहे ते. तुमचा हात हाती घेईल अन् म्हणेल, 'चल ना आई, आपण नंदनवनाची सफर करू.' तुम्हाला स्वर्गातून फिरवून आणेल. अंतराळाच्या अंगणात नेईल अन् आकाशगंगेची मौज दाखवेल. तुम्ही थकलात तर क्षणार्धात बलदंड, मोठा पुत्र होऊन तुम्हाला उचलून घेईल. पटदिशी ढगांच्या शुभ्र मऊ गादीवर निजवील. सुगंधी वायुच्या झुळकांनी सुखवील. त्याचं गोड स्मित पाहूनच तुम्ही टवटवीत व्हाल, असं बाळ कुणाला नाही आवडणार?

पहा, एवढं सुंदर तरल नातं आहे हे अन् त्याचा आनंद हाच इंद्रियातीत आनंद, देहाच्या पलीकडचा. त्याच्या झुल्यात बसून झुलायचं, 'आनंदाचे डोही आनंद तरंग.' आपणच झाल्याचा प्रत्यय घ्यायचा. जमेल ना? अर्थातच, जमेल!

आत्मदृष्टीने सृष्टी बघावी

नित्य शिवाची महती गावी ।
आत्मदृष्टीने सृष्टी बघावी ।।धृ।।

नश्वर आहे आपुली काया ।
जणू उन्हातील ती पडछाया ।
परोपकारी तिज लावावी ।
आत्मदृष्टीने सृष्टी बघावी ।।१।।

असार हा संसार मानूनी ।
सदा असावे ईश्वर स्मरणी ।
वाणी ही तव पावन व्हावी ।
आत्मदृष्टीने सृष्टी बघावी ।।२।।

विकार सर्व तू करी शिवार्पण ।
संगमयुगी या व्हावे पावन ।
सुवर्णसंधी साधून घ्यावी ।
आत्मदृष्टीने सृष्टी बघावी ।।३।।

एक ब्रह्माकुमार

चैतन्य दीपगृह-दीपस्तंभ (लाईट हाऊस) बनुया व विश्वाला सकाश देऊया!

– ब्र.कु. हेमंतभाई शांतिवन, आबूरोड

मनुष्य रात्रंदिवस राब-राब राबतो, आयुष्यभर काबाड कष्ट करतो. पण का? फक्त सुखासाठीच ना! मनुष्य सुखासाठी जगतो नि मरतो. नाना नात्यांनी संबंध-सुख, पदार्थ भोगाने स्वाद-सुख, वस्तू-वैभवाने सुविधा-सुख व ऐश्वर्याद्वारे ऐश-आराम प्राप्त करतो. आज चोहीकडे जणू सुखासाठीच शर्यत लागलेली दिसते. **अधिक सुखपूर्तीच्या उद्देशाने व्यक्ती वस्तू, वैभव व पदार्थांचा संग्रह करतो. त्यातच सर्वत्र वस्तू, वैभव व पदार्थांचा धो-धो पाऊस पडतोय. त्याने जगात जणू शरीर सुखाचा महापूरच आणलायं.**

मुसळधार पावसात घरं पडतात व नदीकाठची गाव महापूरात वाहून जातात. त्यात माणसं, गुरं-ढोरं, पशु-पक्षी-प्राणी, शेती, वृक्ष-वनराई वाहून सारेच पाण्यात बुडतात. खरे तर नदीचे शांत-शुद्ध-शीतल व संयमित वेगानं वाहणारे जलच सुखाचे साधन होय. ह्याउलट गढूळ झालेले, तुफान वेगाने वाहणारे महापूराचे पाणी दु:खाचे कारण बनते. आज व्यक्ती, वस्तू, वैभव व पदार्थाचा पडणारा धो-धो पाऊस मनुष्याला देहाचे अफाट सुख देतोय. महापूराच्या गढूळ पाण्यासारखे लोभ, मोह, आसक्ती आदी विकारांच्या मलिनतेने गढूळ झालेल्या क्षणिक सुखाचा अंत, घोर दु:खातच होतो ना!

जुना माल खपविण्यासाठी व्यापारी एका वस्तू सोबत एक वस्तू फ्री देतो. व्यक्ती, वस्तू-वैभव व पदार्थ ही सुखासोबत दु:ख मोफत देतात. व्यक्ती अल्प प्रेमाबरोबर दीर्घ विरह-वेदना व वस्तू सुविधेसोबत दु:ख दुविधा देतात. वैभव आरामा समवेत गुलामी व पदार्थ भोगाद्वारे रोग देतात. **वर्तमान समयी अल्प सुखानंतर मिळणाऱ्या अति दु:खाचा महासागर उसळ्या मारतांना दिसतोय. क्षणिक सुखाच्या लोभात पडून जन साधारण, दैहिक सुखाच्या प्रबल प्रवाहात वाहत जाऊन, दु:खाच्या सागरी विलीन होताना दिसतात.**

झोपडी, मातीचे कच्चे घर व इमारत या तीन प्रकारच्या घरांचा महापूराने विनाश होतो. तसेच जीवनरूपी विषय वैतरणी नदीच्या तीरावर देहरूपी घरात वसलेले हठयोगी, भोगी व रोगी हे तीन

प्रकारचे आत्मे साधनांच्या महापूरात वाहून, दु:खाच्या सागरात बुडतात. त्यांच्या सुख-शांतीचा नाश होतो. **परंतु दु:खाच्या महासागरात दृढ निश्चयात्मक प्रीत बुद्धीच्या पक्क्या फाऊंडेशन (पाया) वर ... स्वमानात उभे असलेले..... चौथे योगी तू आत्मे.... अज्ञान अंध:कारी भटकलेल्या वाटसरूंना स्वधामाची वाट दाखविणारे.... कुणा मुक्तीच्या ठिकाणी... तर कुणा जीवनमुक्तीच्या आशास्थानी पोहचविणारे..... लाईट हाऊस ठरतात.**

पाऊस-वादळाने झोपडी उडते, असेच देहरूपी हट (Hut) म्हणजे झोपडीत राहणारे .... हट्टाने इंद्रियांचे दमन व मनाला अमन करणारे हठयोगी आत्मे, झोपडीसम त्यांचे तन व मन दुर्बल, विषय वासनांच्या पावसाच्या झडीत दुर्बल देहरूपी कुटीर कोलमडून पडते. दुबळे मन सुखलोलूप इंद्रियांच्या विकारी हट्टापूढे हात टेकते. आत्मा मालक विकारांच्या बळी पडतो. चारित्र्याचा विनाश होतो. विकारांच्या वादळात आत्मदीप ही विझतो. अर्थात अरण्यात राहणारे हठयोगी साधन संपत्तीने आकर्षित होऊन भोगविलासी बनतात व विषय वैतरणी नदीच्या प्रबल प्रवाहात वाहत-वाहत दु:खाच्या सागरात मिळतात.

पावसाच्या झडीत मातीची घरे ही

ढासळतात. असेच इंद्रियरूपी विटांच्या भिंतीचे, देहरूपी मातीचे (देह म्हणजे मातीच ना!) घर व त्यात इंद्रियलोलूप सुखासाठी जगणारे देहाभिमानी भोगी तू आत्मे.... त्यांच्या नसा-नसात दैहीक रसांचे पाणी मुरते... मनाला भुरळ घालणाऱ्या वस्तू बुद्धीला भ्रमित करणारे वैभव व जीभेचे चोचले पुरविणाऱ्या पदार्थांचा धो-धो पाऊस पडताच... ज्यांची ज्ञानेंद्रियें (नेत्र, नाक, जीभ, कर्ण, त्वचा) विषय वासनांनी विरघळतात. भोगांनी रोग व रोगाने शरीर स्वास्थ्य ढासळते. भोगी दु:खाच्या डोहात बूडतात.

इमारतीच्या पायात पावसाचे पाणी मुरल्याने त्याही धराशाही होतात. तसेच सुख-साधनात वाढलेले, संपत्तीच्या ढीगात वावणारे, नोकर-चाकरांचे सौख्य लाभलेले गर्भश्रीमंत.... साजऱ्या गोजऱ्या बलशाली शरीर सदनी (इमारतीत) राहणारे.... चिंता कटकटींमुळे मनाच्या रोगांनी त्रस्त व जीभेने भोग भोगता-भोगता तनाच्या रोगांनी ग्रस्त... नाना रोगांनी घेरलेल्या देहरूपी रोगांच्या माहेर घरात राहणारे, अहंकारी रोगी तू आत्मे ही... भोगविलासी ऐय्यासी जीवनशैलीने दु:खाच्या सागरात बुडून जलमग्न होतात.

परंतु समुद्राकाठी ही ठाम उभे असलेले... एक दिर्घकाळ टिकणारे घर.... पावसात न कोसळणारे.... महापूरात न वाहणारे..... त्या घराच्या शिखरी निरंतर तेवणारा दीप... रात्रीच्या काळ्याकुट्ट अंधारात भटकणाऱ्या जलयात्रींना.... मग ते चोर किंवा व्यापारी... सज्जन अथवा दुर्जन... सर्वांना बिना भेदभाव.... निर्दोष-सम-दृष्टीने... अथक होऊन, पथ प्रदर्शन करणारे.... सुखाचा आसरा देणारे..... नि शांतीचा किनारा दाखविणारे.... योगी तू आत्मे म्हणजेच... चैतन्य दीपस्तंभ.... डिवाइन लाईट हाऊस...

हठयोगी उपवास करतात. (मनाचा हट्ट करून उपवास करणे ही मनमत वा मनुष्यमत होय, श्रीमत नव्हे) अन्न ही पोटाची गरज असूनही काहीच खात नाहीत. इंद्रियाचे दमन केल्याने कुटीच्या गवतासम अवयव अशक्त दुर्बल बनतात. ज्ञानाची समज न देता मनाला जबरदस्तीने शांत करणे अर्थात स्प्रिंगला दाबून ठेवणे म्हणजेच मनाचे दमन करणे होय. जेव्हा विकार पूरक पदार्थ, साधन-सुखाचा पाऊस पडतो, तेव्हा इंद्रिय-सुखात भिजल्याने मनाचा तोल जातो व वासनांच्या वादळाने हठयोगी काम-क्रोधाला बळी पडतात.

भोगी तू आत्मे मुळी खाण्यासाठीच जगतात ना! समजा कुठे कांदाभजी तळली जात असेल तर नाकाला वास येतो, नाक मनाला भजीचा संदेश देतं. मनरूपी बाळ आत्म्यारूपी आईकडे भजीचा हट्ट करतो, आत्मा बुद्धीरूपी मुलीला 'भजी खाऊ की नको?' हे विचारते. तमोगुणी बुद्धी इंद्रिय सुखाचा निर्णय देते. दैहिक सुखाचे तमोगुणी संस्कार जागे होतात. भजी शोधण्यासाठी डोळे इकडे तिकडे नजर फिरवतात. भजी दिसल्यावर पाय तिकडे वळतात. हात भजी उचलतो व तोंडात टाकतो. आत्मा जीभेने भजीचा स्वाद घेतो. एकूण 'भजी खाणे' ह्या देह-सुख देणाऱ्या विकारी कर्मासाठी मन-बुद्धी-संस्कार तसेच नाक, डोळे, पाय, हात व तोंड एकत्र येतात.

गाऱ्याने (माती व पाण्याचे मिश्रण) विटांना एकमेकांशी जोडून मातीची भिंत बनून, घर बांधले जाते. तसेच इंद्रियरूपी विटा ऐहिक सुखासाठी (शरीर सुखरूपी माती व दैहिक प्रेमरूपी पाण्याचे मिश्रण) एकमेकांशी जोडल्या जातात व भोगी आत्मा देहात विकारजनीत सुखात लिप्त होतो, विषय, वासनाच्या पूर्तीसाठी देहाचे सर्व अवयव देहाच्या प्रेमात पडतात, नि कागविष्ठासमान देहसुखासाठी विभिन्न अंग एकी करतात. जसे घर बांधण्यासाठी विट विटेला चिकटते, तसे विकारी सुखासाठी अंग अंगाला (नाक, कान, जीभ) मिळतात.

रोगी तू आत्मे गरजेपेक्षा जास्त प्रमाणात पदार्थ, वस्तू-वैभव उपलब्ध असूनही दु:खाने बेजार होतात. सणावाराला लाडू करंज्या खाणे वावगे नाही. पण रोजच थाळी भरून गुलाबजाम खाल्ले, तर डायबिटीज (शुगर) होईल की! जीभेची टेस्ट (चव) पोटात वेस्ट (नको असलेली व व्यर्थच जमा झालेली चरबी) व देहात रोग होतो गेस्ट (पाहुणा). त्याने तन-मन रोगांचे गेस्ट हाऊस म्हणजे नाना रोगांचे माहेरघर बनते. झक्कास इमारती सारखे गुबगुबीत लठ्ठ शरीर दिसायला खूपच छान-सुंदर पण सौख्य मात्र काडीचे देत नाही.

योगी तू आत्मे खाण्यासाठी जगत नाहीत, तर जगण्यासाठी अन्न, तेही प्रसादरूपाने ग्रहण करतात! गरजेनुसार थोड्यातच तृप्त होतात! इंद्रियांचे विषय-सुखाचे नको ते फाजिल लाड पुरवत नाहीत, तर आत्म-संयमाने, अंग-प्रत्यंगांवर ताबा ठेवतात. कांदेभजी असो वा गुलाबजाम, त्याने योगींच्या तोंडाला पाणी सुटत नाही, कारण जसा

शिळांवर पदार्थ व पाण्याचा प्रभाव पडत नाही, तसेच शीतल योगींचे अचल अंग शिळेसमान प्रभावमुक्त (प्रभावप्रूफ) असते. त्यांच्या अचल अवयवांवर स्वाद व सुंगधांचा प्रभाव पडत नाही.

योगी दु:खाच्या भवसागरात उभे असलेले चैतन्य दीपगृहच ना! त्यांची काया जणू अचल-इंद्रियरूपी शिळांचे अचलघर... सक्रीय ज्वालामुखी द्वारे धरणीच्या भूगर्भातील तप्त लाव्हारस भूंकपाने बाहेर पडतो. हा लाव्हारस दिर्घकाळ थंड झाल्यावर दगडाचा पहाड बनतो. तेथून दीपगृहासाठी शिळा कापल्या जातात. नंतर समुद्राकाठीच्या खडकाळ जमिनीच्या मजबूत पायावर सिमेंट, वाळू व स्वच्छ पाण्याच्या मिश्रणाने शिळा जोडून, भक्कम दीपगृह बांधले जाते.

देहरूपी धरणीत सक्रीय योगी तू आत्मे जेव्हा निरंतर ज्वालामुखी योग करतात. तेव्हा त्यांच्या प्रीतबुद्धीरूपी गर्भातून पशु, पक्षी, प्राणी, प्रकृती, पुरूष (आत्मा) व परमपुरुषा (परमात्मा) प्रतीचे प्रगाढ प्रेम ओसंडते. (धरतीच्या पोटात लाव्हारस व आत्मारूपी आईच्या बुद्धीरूपी पोटात लव्ह म्हणजे प्रेम-रस.) ज्वालामुखी योगाच्या लवलीन (प्रभूप्रेमात मग्न) स्थितीत दीर्घकाळ राहिल्याने, प्रगाढ प्रभू प्रेमाच्या प्रभावाने योगींचे अंग-अंग शीतल नि शीळेसमान अचल बनतात. ईश्वरीय सुखाने (अतींद्रिय सुखरूपी सिमेंट, श्रेष्ठ कर्मरूपी वाळू व प्रभू प्रेमाच्या पाण्याचे मिश्रण) अचल अंगरूपी शिळा एकमेकास घट्ट चिकटून अचलघर बनते.

अशा योगी आत्म्यांच्या अचल इंद्रियरूपी शिळांच्या भिंतीवर (देहावर) दु:खाच्या सागराच्या, काम-क्रोधादि विकारांच्या लाटा आदळतात. पण त्यांचा प्रभाव पडत नाही म्हणजे विकारी लाटांनी अचल अंग चंचल होत नाही. त्यांच्या शरीर प्रकृतीवर अतिशीत व अतिउष्ण वातावरणाचा प्रभाव पडत नाही. सारांशाने ते मायाजीत व प्रकृतीजीत असतात. उन्हाळा, पावसाळा व हिवाळ्याने दीपगृहावर काही फरक पडत नाहीत. तसेच जय-पराजय, निंदा-स्तुती, हानी-लाभ इत्यादीमुळे योगीच्या एकरस स्थितीत अंतर येत नाही. विषम परिस्थितींमध्ये ही योगी तू आत्मे. अचल, अडोल असतात.

हठयोगी, भोगी, रोगी आत्मे विषय-वासनांच्या प्रबल प्रवाहात वाहतात आणि आत्मिक सुख-शांतीला पारखे होतात नि दु:खाच्या सागरात जलमग्न होतात. **परंतु जसे समुद्राकाठी उभे स्थूल लाईट हाऊस स्व प्रकाशाने मार्ग दाखवतो. तसेच योगी तू आत्मे ही चैतन्य दीपस्तंभ बनून, आत्म-प्रकाशाने पथ दाखवतात.** परमपवित्र आत्मिक स्थितीद्वारे (पवित्रता ही सुख-शांतीची जननी असल्याने) चालताना-फिरताना आत्मिक सुख व शांतिची अनुभूती करवून, स्वर्गिक सुखधामाचे आश्रयस्थान व शांतिधामाचे ठिकाण दाखवितात.

लाईट-हाऊस, रेल्वे व हॉस्पिटल हे डायरेक्ट वीजनिर्मिती केंद्राशी जोडलेले असल्याने तेथे अखंड वीज पुरवठा होतो. त्याप्रमाणे योगी तू आत्म्यांचा संपर्क, संबंध व संवाद निरंतर एका सर्व शक्तिवान परमात्म्याशी (लाईट हाऊसशी) असतो. ते सत्यम्शी मनाच्या सतत संपर्काद्वारे ज्ञान, शिवम्शी बुद्धीच्या अटूट संबंधाद्वारे सर्व शक्तीं व सुंदरम्शी हृदयातील स्वाभाविक (Natural) संवादाने दिव्यगुण प्राप्त करतात. सर्व संबंध एका शिवाशीच जोडून ज्ञान, गुण व शक्तींनी संपन्न बनतात. स्वत: दृढनिश्चयात्मक प्रीतबुद्धीच्या फाऊंडेशनवर स्वमानात टिकतात. श्रीमतानुसार कर्म करून परमपवित्र स्थितीने चालता-फिरता चैतन्य दीपस्तंभ बनून, सुख शांतीचा सकाश देतात.

'मी कोण' हे स्वत:च मनाला विचारले असता काय उत्तर मिळते बरे? 'मी एक आत्मा हेच ना!' अंतर्मनी खोल उतरले तर काय दिसते. मी आत्मा ज्योतिबिंदू (Point of light पॉइन्ट ऑफ लाईट)... देहरूपी घरात (House हाऊस).... प्रकाश पसरविणारी एक अत्यंत तेजस्वी चांदणी (Sparkling Star स्पार्क्लिंग स्टार)..... श्वेतधवल अन् शुभ्र (Bright & Bright ब्राईट एण्ड ब्राईट) प्रकाशमय

लाईट-हाऊस, रेल्वे व हॉस्पिटल हे डायरेक्ट वीजनिर्मिती केंद्राशी जोडलेले असल्याने तेथे अखंड वीज पुरवठा होतो. त्याप्रमाणे योगी तू आत्म्यांचा संपर्क, संबंध व संवाद निरंतर एका सर्व शक्तिवान परमात्म्याशी (लाईट हाऊसशी) असतो.

अन् हलका फुलका (Light & Light लाईट एण्ड लाईट)..... डबल लाईट... एक दिव्यमणी (Divine Light डिवाईन लाईट).... देहरूपी हाऊस (घर) मध्ये राहणारा मी लाईट (प्रकाश).... अर्थात मी एक रूहानी, चैतन्य, अलौकिक दीपगृह आहे.

शरीररूपी अचलघराच्या शिखरी चमकता लख्ख शुभ्र तारा, ह्या देहरूपी गृहात तेवणारा चैतन्य आत्मदीप (I am the light in this House)..... चैतन्य अन् चालता-फिरता (Living & Moving) रूहानी दीपस्तंभ... स्पिरिच्युअल लाईट हाऊस.... मज आत्म्यावर त्या ज्ञानसूर्य परमात्म्याची ज्ञान-गुण-शक्तीची किरणे पडत आहेत. मज ज्योतिबिंदू (Point of light) आत्म्यावर त्या परमतेजस्वी परमज्योतिच्या (Supreme light) पवित्रतेची वर्षा होत आहे.... मी परमपवित्र बनत आहे.. मी पवित्रतेचा दीपस्तंभ (Tower of Purity टॉवर ऑफ प्युरिटी) बनलो आहे.... शांतीचा दीपस्तंभ (Tower of Silence टॉवर ऑफ सायलेन्स)..... सुखाचा दीपस्तंभ (Tower of Happiness टॉवर ऑफ हॅप्पीनेस)....मज सुखस्वरूप आत्म्याची....आत्मिक सुखाची किरणे... शांतस्वरूप आत्म्याची... शांतिची किरणे.... सर्वत्र पसरत आहेत.....

माझ्या उदार हृदयातल्या उत्कट प्रेमाच्या लहरी सर्वांपर्यंत पोहचत आहेत. दु:खी जन सुखी व अशांत आत्मे शांत होत आहेत..... पृथ्वी, जल, अग्नि, वायु व आकाश.... सारीच पंचतत्त्वे पावन होत आहेत..... भटकत्या आत्म्यांना मुक्ती व अन्य आत्म्यांना जीवनमुक्ती मिळत आहे... मज प्रेमस्वरूप आत्म्याचा प्रेम-प्रकाश .... सर्वत्र पसरतोय.... अगरबत्तीच्या दरवळत्या सुंगधासमान... मज शुभभावना संपन्न आत्म्याच्या.... सद्भावनांचा सकाश.... सर्वांना प्राप्त होत आहे..... मी चालता-फिरता... पवित्रतेचा दीपस्तंभ... माझे अंग-अंग पवित्र... नयनकमल... मुखकमल... हस्तकमल... कर्णकमल... पदकमल.... मज परमपवित्र आत्म्यांच्या पवित्र संकल्प- बोल - कर्मांने - सर्व आत्म्यांना..... अलौकिक सुख-शांतिची अनुभूति होत आहे.....

तर मग चला, आता उशीर कशाला? अथक आत्मिक अभ्यासाने, वरती वर्णिलेले चैतन्य लाईट हाऊस बनूया. प्रकृती (पंचतत्त्वे) व पुरुषाची (पुरुष म्हणजे आत्मा, भटकते अशांत, अतृप्त, भूत-प्रेतात्मे, भक्त-आत्मे इत्यादींची) पुकार ऐकू या. चालता-फिरता ज्यावर ही दृष्टी जावी, विकारी की भिकारी, काळे-गोरे, जल-थल-नभ या सर्वांवर असीम स्नेहामृताचा वर्षाव करूया. साऱ्या विश्वाला प्रेमाचा प्रकाश व स्नेह-सद्भावनांचा सकाश देऊया!

मास्टर स्नेहाचे सागर बना

व सर्वत्र आत्मिक स्नेहाचा सुगंध पसरवा....

सागराच्या किनारी गेल्यावर जशी कोणालाही शीतलता व शांतीची अनुभूती होते, तशी आपल्याद्वारे सर्वांना आत्मिक स्नेहाची अनुभूती झाली पाहिजे. कारण आपण स्नेहसागर शिवबाबांची मुले मास्टर स्नेहाचे सागर आहोत. त्यामुळे आपल्या संबंध-संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला असे वाटले पाहिजे की आपण स्नेहाच्या प्राप्तीच्या ठिकाणी आलो आहोत. आत्मिक स्नेहाची अनुभूती, आत्मिक सुगंध वायुमंडळमध्ये अनुभवाला आला पाहिजे. शिवबाबांचे आम्ही स्नेही आहोत; असे तर सर्वच म्हणतात. तसेच शिवबाबा देखील जाणतात की सर्व मुलांचा स्नेह आहे. **परंतु समयानुसार आता आत्मिक स्नेहाचा सुगंध साऱ्या विश्वात पसरायला हवा. प्रत्येक आत्म्याला या सुगंधाचा अनुभव आला पाहिजे. प्रत्येक आत्म्याने म्हटले पाहिजे की हा श्रेष्ठ आत्मा आहे. त्यामुळे केवळ शिवबाबांचे स्नेही नाही तर सर्वांचे सदा स्नेही बना.**

आजची दुनिया ही खऱ्या आत्मिक स्नेहाची भूकी आहे. स्वार्थी स्नेह पाहून, त्याचा सर्वांना उबग आला आहे. त्यामुळे आत्मिक स्नेहाची थोड्या वेळाची अनुभूती सुद्धा, त्यांना आपल्या जीवनाचा सहारा वाटेल.

- आदरणीय दादी गुलजारजी

सचित्र सेवावृत्त

मालाड (मुंबई) : त्रिमूर्ती शिवजयंती महोत्सवात दीप प्रज्वलन करतांना टीव्ही कलाकार किकू शारदा, रिवा शारदा व ब्र.कु. कुंती बहेन

परंडा (बार्शी) : शिवध्वजारोहण प्रसंगी उपस्थित डॉ. आनंद मोरे, नगरसेविका संजना मोरे, ब्र.कु. संगीता बहेन व महादेवी बहेन

डहाणू : महाशिवरात्री महोत्सवात दीप प्रज्वलन करतांना माजी नगराध्यक्ष मिहीर शहा, समाजसेवक श्री. पांचाळ, ब्र.कु. हर्षदा व राजश्री बहेन

चिखली (बुलढाणा) : महाशिवरात्री निमित्त शोभायात्रेचे उद्‌घाटन केल्यानंतर नगराध्यक्ष प्रियाताई बोंद्रे, श्री. कुणाल बोंद्रे, ब्र. कु. सुरेखा व निर्मला बहेन

इस्लामपूर : महाशिवरात्रीचे रहस्य समजावून सांगतांना ब्र.कु. अरुणा बहेन, मंचासीन ब्र.कु. शोभा बहेन, मा. शिवानंद महाराज व मा. बोधानंद महाराज

बार्शी : शिवध्वजारोहण करतांना ब्र.कु. संगीता बहेन, प्राचार्य प्रकाश थोरात, वकील राहुल करंजकर व अन्य

वर्धा : महाशिवरात्री महोत्सवात उपस्थित नगराध्यक्ष श्री. अतुल तराळे, जि.प. सदस्य श्री. देव व ब्र.कु. माधुरी बहेन

अकलुज : महाशिवरात्री महोत्सवात दीप प्रज्वलन करतांना ब्र.कु. नंदा बहेन व इस्लाम बोहरी समाजाचे कार्यकर्ते

शेगाव : महाशिवरात्री निमित्त शिव संदेश देतांना ब्र.कु. शारदा बहेन, मंचासीन नगराध्यक्षा शकुंतला देवी, प्राचार्य डॉ. सोमाणी व अन्य मान्यवर

उस्मानाबाद : त्रिमूर्ती शिवजयंती महोत्सवात दीप प्रज्वलन करतांना माजी आमदार ओम् राजे निंबाळकर, माजी नगराध्यक्ष श्री. पाटील व ब्र.कु. शिवरात्री बहेन

सावंतवाडी : महाशिवरात्री महोत्सवात शिव संदेश देतांना ब्र.कु. शोभा बहेन (गोवा) ब्र.कु. कांचन बहेन, उपमहापौर अन्नपूर्णा कोरगावकर व अन्य

मीरा रोड (मुंबई) : महाशिवरात्री निमित्त आयोजित कार्यक्रमात केक कापतांना प्राचार्य श्री. थोईटे, ब्र.कु. रंजन बहेन व अन्य मान्यवर

भुसावळ : महाशिवरात्री महोत्सवात दीप प्रज्वलित करतांना उप नगराध्यक्ष श्री. युवराज लोणारी, मुख्याधिकारी (सिडको) श्री. बावीस्कर, व्यापारी श्री. भटेजा, ब्र.कु. सिंधू दीदी व दिपा बहेन

वाशी (नवी मुंबई): महाशिवरात्री महोत्सवात दीप प्रज्वलित करतांना ब्र.कु. शीला दीदी, इन्स्पेक्टर सचिन हिरे, श्री. नवनीत जैन, रिलायन्स प्रॉजेक्ट मॅनेजर डॉ. अलका चड्डा

शिरूर : महाशिवरात्री महोत्सवात आयोजित विशाल शोभायात्रा तसेच नगराध्यक्ष सौ. वैशालीताई वाच्यारे व श्री. दादाभाऊ वाच्यारे यांचा सत्कार करतांना ब्र.कु. अर्चना, शंकुतला बहेन व ब्र.कु. गणेश कोळपकर

बांबवडे (कोल्हापूर) : महाशिवरात्री निमित्त निर्मित अमरनाथ प्रतिकृती समोर ग्रुप फोटोत सरपंच विष्णु यादव, ब्र.कु. संगीता बहेन व अन्य

सटाणा (मालेगाव) : शिवध्वजारोहण करतांना नगराध्यक्ष श्री. सुनिल मोरे, नगरसेविका डॉ. विद्या सोनवणे व ब्र.कु. अंजु बहेन

डोंबिवली (ठाणे) : आध्यात्मिकता द्वारे सडक सुरक्षा या प्रदर्शनाचे आयोजन प्रसंगी आर.टी.ओ. श्री. गोविंद गंभीरे यांना ईश्वरीय भेटवस्तू प्रदान करतांना ब्र.कु. शकू दीदी

पुणे (कर्वेनगर) : मा. उपमहापौर तसेच नगरसेवक श्री. दिलीप बराटे यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र.कु. सुनिता बहेन, सोबत ब्र.कु. सुजाता बहेन

सटाणा (देवळा) : फिल्म अभिनेत्री सारा श्रवण यांच्याशी ईश्वरीय ज्ञान चर्चा करतांना ब्र.कु. दिपमाला बहेन

पाचोरा : नगराध्यक्ष श्री. छोटूभाई मोहिल यांचा सन्मान केल्यानंतर ग्रुप फोटोत राजयोगिनी मीरा दीदी, ब्र.कु. अविनाश, तुकाराम, अशोक व प्रमोद भाई

श्रीरामपूर (अहमदनगर) : नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक यांना आत्मस्मृतीचा तिलक लावल्यानंतर ईश्वरीय सौगात देतांना ब्र.कु. मंदा बहेन, शेजारी ब्र.कु. रोहिणी बहेन.

लोहणेर (सटाणा) : महाशिवरात्री महोत्सवात योग कक्षाचे उद्‌घाटन करतांना उपसरपंच, डॉ. सुभाष अहेर, ब्र.कु. अंजू व दीपाली बहेन

केसनंद (पुणे) : महाशिवरात्री निमित्त आयोजित कार्यक्रमात सरपंच सौ. सुजाताताई सावंत यांचा सत्कार करतांना ब्र.कु. सुनिता दीदी, शेजारी ब्र.कु. सुनिल भाई

महावीर हनुमान

(हनुमान जयंती निमित्त विशेष)

-ब्र.कु. नीता, मुंबई, बोरीवली वेस्ट

भक्तिमार्गामध्ये मनुष्याची श्रद्धा देवी, देवतांप्रती कायम रहावी म्हणून निरनिराळ्या देवतांचे चरित्र अनेक कथांद्वारे रेखाटले आहे. तसेच सप्ताहातला प्रत्येक दिवस कोणत्या ना कोणत्या देवतांची आराधना करण्यासाठी ठेवला गेला. जसे सोमवार शिवाची उपासना करण्यासाठी, मंगळवार गणपतीसाठी.... तसेच शनिवार हनुमानाची पूजा करण्यासाठी राखला आहे. ह्या देवतांचे आगळे-वेगळे रूप मनामध्ये कुतूहल निर्माण करते. ह्याच्या पाठीमागे आध्यात्मिक रहस्य जरूर दडले आहे. आपण त्यांची उपासना करतो ती फक्त श्रद्धेपोटी नसावी. परंतु त्या पाठीमागे आपला विवेक ही जागृत असावा.

जसे गणेशाला विघ्नविनाशक म्हटले जाते. त्याचप्रमाणे हनुमानालाही संकटमोचन म्हटले गेले आहे. प्रत्येक शनिवारी हनुमानाची विशेष पूजा केली जाते. पौराणिक कथांमध्ये जे वर्णन केले आहे. त्या अनुसार आपल्या समोर एक असे व्यक्तिमत्त्व नजरेसमोर उभे राहते की हनुमान महा बलाढ्य असून रामायण काळामध्ये त्यांनी श्रीराम ह्यांच्याबरोबर, त्यांच्या महान कार्यामध्ये निष्काम भावनेने सेवा केली. रामचरितमानस मध्ये तुलसीदास ह्यांनी जनसमुदायाला काही समजवण्याच्या उद्देशाने एक अप्रतिम व्यक्तिरेखा हनुमानाच्या रूपाने आपल्या समोर ठेवली आहे. त्यांचे निराळे रूप आध्यात्मिकतेची रहस्यमय प्रतिमा आहे. हनु अर्थात हनुवटी जो चेहऱ्याचा अगदी खालचा भाग आहे. मान अर्थात बढाई, गरिमा, सन्मान. **हनुमान याचा शब्दश: अर्थ असा आहे की ज्याने आपल्या मान-सन्मानाला आपल्या हनुवटीच्या खाली ठेवले म्हणजेच त्यावर विजय प्राप्त केला, त्याच्या प्रभावापासून स्वत:ला मुक्त ठेवले.** म्हणूनच श्रीरामांच्या चरणापाशी हनुमान हात जोडून बसलेले दाखवले जाते. हनुमान ह्यांना बालक रूपातही दाखवले आहे. बालक समान निष्कलुषित हृदयाची व्यक्तीच मान-सन्मानाच्या अपेक्षेपासून मुक्त राहून, खऱ्या अर्थाने ब्रह्मचर्याचे पालन करू शकते.

माता अंजनी आणि पिता केसरी यांचा पुत्र आहे हनुमान. अंजनी अर्थात डोळे, नयन आणि पिता केसरी अर्थात सिंहासारखे अभूतपूर्व साहस तसेच निर्भय वृत्ती. माणसाच्या दृष्टीद्वारे त्याच्या चांगल्या अथवा वाईट भावना स्पष्ट होतात. विशुद्ध चिंतन आणि सिंहासारखी अभयवृत्तीच हनुमानाला जन्म देऊ शकते. हनुमान बाल्यावस्थेतही अतिशय साहसी, निर्भय होते. ज्यांना 'पवनपुत्र' म्हणूनही ओळखले जाते. पवन अर्थात वायुपेक्षा ही गतिशील असणाऱ्या मनाचा तो पुत्र. परंतु अशा महान चरित्राचे प्रतिक वानर रूपामध्ये का दाखविले आहे? असा प्रश्न नक्कीच आपल्या मनामध्ये उभा राहिला असेल. कुठे ते महान व्यक्तित्त्व आणि कुठे ते वानररूप. वानर हे मनुष्याच्या अविवेकी चंचल मनाचे प्रतिक आहे. आपले मनसुद्धा वानरासारखे सतत भटकत असते. एका ठिकाणी वानराची उपमा तर दुसऱ्या ठिकाणी पवन हे दोन्ही चंचल वृत्तीचे रूपक आहे. **पण हनुमानाला वानराधीश संबोधण्याचे तात्पर्य आहे की तो मनरूपी वानराचा अधिपती म्हणजेच स्वामी आहे. ज्याचे आपल्या चंचल इंद्रियांवर नियंत्रण आहे, जो स्वत:च्या मनाचा स्वामी आहे. तोच रामरूपी ईश्वराचा सर्वोत्तम सेवक**

जसे गणेशाला विघ्नविनाशक म्हटले जाते. त्याचप्रमाणे हनुमानालाही संकटमोचन म्हटले गेले आहे. प्रत्येक शनिवारी हनुमानाची विशेष पूजा केली जाते. पौराणिक कथांमध्ये जे वर्णन केले आहे. त्या अनुसार आपल्या समोर एक असे व्यक्तिमत्त्व नजरेसमोर उभे राहते की हनुमान महा बलाढ्य असून रामायण काळामध्ये त्यांनी श्रीराम ह्यांच्याबरोबर, त्यांच्या महान कार्यामध्ये निष्काम भावनेने सेवा केली.



हनुमान यांच्या जीवनातले कितीतरी प्रसंग आपल्याला रहस्यमय संदेश देतात. हनुमान अतिशय निर्भयवृत्तीचे अफाट सामर्थ्य असणारे तसेच सूर्याचे तेजस्वी रूप बघून त्याला पकडण्याचा प्रयत्न करणारे... त्यांच्या शक्तीचे अनेक कारनामे प्रसिद्ध असल्यामुळे, त्यांना कोणत्याही गुरूकुल मध्ये प्रवेश मिळत नव्हता.

होऊ शकतो. तसेच धार्मिक कार्यांमध्ये निष्काम भावनेने सेवा करू शकतो. ईश्वराप्रति अटूट विश्वास असल्यामुळे त्याच्या प्रत्येक आज्ञेचे पालन करणारा एक आज्ञाधारक, महावीर अशा रूपात ही त्यांची व्यक्तिरेखा दर्शविण्यात आली आहे.

हनुमान यांच्या जीवनातले कितीतरी प्रसंग आपल्याला रहस्यमय संदेश देतात. हनुमान अतिशय निर्भयवृत्तीचे अफाट सामर्थ्य असणारे तसेच सूर्याचे तेजस्वी रूप बघून त्याला पकडण्याचा प्रयत्न करणारे... त्यांच्या शक्तीचे अनेक कारनामे प्रसिद्ध असल्यामुळे, त्यांना कोणत्याही गुरूकुल मध्ये प्रवेश मिळत नव्हता. एकदा माता अंजनीच्या विनवणी खातिर त्यांना एका गुरूकडून सहमति मिळाली. असाधारण व्यक्तिमत्त्व असल्यामुळे हळूहळू त्यांना आपल्या शक्तीचा अभिमान येऊ लागला. आपल्या शक्तींचे प्रदर्शन करताना कितीतरी वेळा अनेकांचे नुकसान ही होत असे. एकदा त्यांच्या चुकीच्या वर्तनामुळे गुरू त्यांना शिक्षा देतात. गुरूकुलात असलेल्या सर्व शिष्यांना भोजन गरम करून देण्याची शिक्षा त्यांना दिली जाते. जेव्हा जेवण गरम करण्यासाठी ते आग पेटवण्याचा प्रयत्न करतात, फूक मारतात. पण आग पेटत नाही. हे दृश्य बघून बाकीचे शिष्य जोर-जोराने हसू लागतात. आपली चेष्टा होत आहे. हे समजून, त्यांचा राग अनावर होऊन ते खूप जोराने फूक मारतात. परंतु सर्व आश्रमालाच आग लागते. मुलांचा आरडा-ओरडा, धावपळ.... ह्यांनी आश्रमाचे वातावरण पूर्णपणे अशांत होते. हे सगळे पाहून गुरूंना अतिशय राग येतो. ते हनुमानाला श्राप देतात की जोपर्यंत तुला कोणी तुझ्या शक्तींची आठवण करून देत नाही. तोपर्यंत तू कधीच तुझ्या शक्तीचा वापर करू शकणार नाहीस. माता अंजनीला हे ऐकून फार दु:ख होते व ती गुरूंना खूप विनवणी करते. गुरूंना तिची दया येते व ते हनुमानाला उ:शाप देतात की 'त्यांच्या जीवनात असा ही क्षण येईल ज्यावेळी श्रीराम त्यांना भेटतील व ते या श्रापातून मुक्त करतील.' काही काळ लोटल्यानंतर जेव्हा खरंच श्रीराम त्यांच्या जीवनात येतात. तेव्हा हनुमानाचे जीवन पूर्णपणे बदलून जाते. रावणाच्या लंकेमध्ये जाण्याआधी हनुमानाला वारंवार आठवण करून द्यावी लागली की 'तू महावीर आहेस, तू पवनपुत्र आहेस...' या कथेचा आपल्या जीवनाशी काय संबंध आहे, हे आपण पाहूया.

ह्या सृष्टीरूपी रंगमंचावर चाललेली आपली भूमिका जर पाहिली तर आपल्याला ही कोणत्या न कोणत्या गोष्टींचा अभिमान आला आहे - कलेचा, सौंदर्याचा, संपत्तीचा, शक्तींचा, बुद्धीचा, पदाचा... हा अभिमानच आपल्या दु:खाचे खरे कारण आहे. स्वत:ची खरी ओळख माहित असली तरीसुद्धा त्या स्वरूपात टिकणे आज ही अवघड आहे. ह्या कलियुगी दुनियेचे वातावरण, पदोपदी येणाऱ्या अनेकानेक समस्या, मनात चालणारे वादळ, जुने संस्कार व आसक्ती ह्या सर्वांमुळे आपण ईश्वरीय ज्ञान विसरून जातो व आपली साधारण स्थिती बनते. **म्हणून शिवरामांना सुद्धा वारंवार आपल्यामध्ये असलेल्या सूप्त गुणांना जागृत करण्यासाठी आठवण करून द्यावी लागते की 'हे आत्मा, तू पवित्र आहेस, शांतस्वरूप आहेस, मास्टर सर्वशक्तिवान आहेस....' जेव्हा ते गुण आपल्यात पूर्णत: जागृत होतात. तेव्हा आपण रावण अर्थात ५ विकारांवर विजय मिळवू शकतो.**

'हनुमान' ज्यांच्यामध्ये ईश्वरीय निष्ठा तसेच प्रभूप्रेमामध्ये मग्न (मगन) होण्याची विशेषता दिसून येते. हृदयामध्ये श्रीरामा व्यतिरिक्त कोणीही नाही. अपार प्रेम आणि दृढ विश्वास हे गुण प्रकर्षाने दिसतात. याअनुषंगाने एक रोचक कथा रामायणात वाचायला मिळते. महावीर

>> पान २५ वर

लेखांक १७ वा

ईश्वरीय कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

– दिवंगत ब्र.कु. रमेश शाह, मुंबई, गावदेवी

संगमयुगी किंवा सत्ययुगी सृष्टीमधील कारभारामध्ये सर्व प्रकारचे व्यवहार कसे असावेत, त्याबाबत आपण चर्चा करीत आहोत. आपण प्रथम लौकिक प्रबंधन गुरूंबद्दल गोष्टी केल्या. तसेच मागील लेखांमध्ये परमात्मा परमशिक्षकाच्या रूपामध्ये कशी शिकवण देत आहेत; त्याबाबत चर्चा केली. पुढे तीच शृंखला नेत मी माझे अनुभव या लेखात लिहित आहे.

जेव्हा 'वर्ल्ड रिन्युअल स्पिरिच्युअल ट्रस्ट' नोंदणीकृत करायचे ठरले. तेव्हा प्रिय ब्रह्माबाबांनी मला पत्राद्वारे ट्रस्टचा कारभार कसा आदर्श असावा, याबाबत प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. **त्याच संदर्भात बाबांनी मला पत्र लिहिले की, ईश्वरीय सेवेत व्याजाचा कोणताही कारभार करू नये. म्हणजे व्याजाच्या कमाईच्या आधारावर यज्ञाचा कार्यव्यवहार चालू नये. जी काही धनप्राप्ती होईल, ती प्रथम सेवेत उपयोगात आणावी आणि त्यानंतर जर बचत होत असेल. तर ती अचल संपत्तीवर लावावी.** मी जेव्हा बाबांची ही महावाक्ये वाचली. तेव्हा मला जाणीव झाली की, बाबा किती मोठे अर्थशास्त्रज्ञ आहेत! या ईश्वरीय विश्व विद्यालयाचा आर्थिक कारभार बाबांच्या कमाईच्या संचित धनाद्वारेच अनेक वर्षे चालला. बाबांनी आपले तन-मन-धन संपूर्ण ईश्वरीय सेवेत समर्पित केले होते.

व्याज घेऊ नये, याच्यामागे अर्थव्यवस्थेचा फार मोठा सिद्धांत आहे हे समजण्यासाठी त्या प्रकारची दृष्टी असावी लागते. १९३० मध्ये वैश्विक महामंदी आली होती. त्याचे कारण असे होते की, व्यापाऱ्यांनी १९२४ पासून हप्त्याने खरेदीची पद्धत (Installment Buying) सुरू केली होती. पूर्वी जोपर्यंत पैसे जमा होत नव्हते, तोपर्यंत वस्तू खरेदी करता येत नव्हती. परंतु १९२४ मध्ये जेव्हा हप्त्यांवर माल विकायला सुरू केला, तेव्हा चल व अचल संपत्तीची मागणी वाढू लागली. मागणी वाढल्याने, व्यापाऱ्यांनी उत्पादन वाढविले. तसेच खूप घरे बांधली. परंतु मागणी अल्पकालीन होती. ज्यांच्याकडे पूर्वी चल व अचल संपत्ती खरेदी करायला पैसे नव्हते. त्यांनी देखील खरेदी केली. व्यापाऱ्यांनी उत्पादन तर भरपूर करून ठेवले होते आणि मग त्याची मागणी ओसरून गेली. परिणामस्वरूप, १९३० मध्ये देश-विदेशांत महामंदी (Financial Crisis) सुरू झाली. या आर्थिक महामंदीवर प्रसिद्ध अर्थशास्त्री केन्स (Keynes) यांनी उपाय सुचविला की, जेव्हा जनतेद्वारा अचल संपत्तीची मागणी होत नाही, तेव्हा सरकारला जनकल्याणाच्या कार्यात खर्च करण्यासाठी पुढे यायला हवे. उदाहरणार्थ, सरकारने रस्ते बनवावेत, ट्रेन, बस यांवर खर्च करून कृत्रिम मागणी (Artificial demand) वाढवावी. सरकारने आता गोल्ड स्टॅण्डर्ड (Gold Standard) चा सिद्धांत सोडून द्यावा आणि Deficite finance चे कार्य सुरू करावे म्हणजे सरकार जनहित कार्यावर जो खर्च करेल, त्यावर टॅक्स घ्यावा आणि जेथे तोटा होत असेल, तेथे कागदाच्या नोटा छापाव्यात व अर्थव्यवस्थेला पुढे न्यावे. मिळकत कमी असेल तर सरकार अधिक खर्च करून प्रत्येक वस्तूची मागणी (Demand) वाढवू शकते. ज्याला इंग्रजीत म्हणतात. Government should inject more money into the circulation and thereby create more demand so that more job opportunities are created.

सरकारने जेव्हा Deficit financing चा कारभार सुरू केला. तेव्हापासून अर्थव्यवस्थेत एक नवी समस्या उभी राहिली, ज्याला चलन फुगवटा (inflation) म्हणतात. या चलनवाढीच्या परिणामस्वरूप दिवसेंदिवस वस्तूंच्या किंमती वाढू लागल्या आणि पैशाची किंमत कमी होऊ लागली. जसे भारतामध्ये १९१५ ते १९१७च्या दरम्यान भारताचा १ रुपया अमेरिकेच्या १७ डॉलर बरोबर होता. तो आज १ अमेरिकन डॉलर ५८ ते ६० रुपयाबरोबर आहे. यावरून सिद्ध होते की, चलन

आपल्या भाऊबहिणींकडून आपल्याला जो आर्थिक सहयोग मिळतो, ते धन सेवेसाठी उपयोगात आणावे आणि जी बचत होते, ती चल-अचल संपत्ती खरेदी करण्यासाठी लावावी. मुख्य म्हणजे धन हे धनाच्या रूपातच न ठेवता, अचल संपत्ती खरेदी करण्यासाठी वापरावी. या चल-अचल संपत्तीमुळे आपल्याला ईश्वरीय सेवेत संरक्षण होते किंवा वाढ होते.

फुगवटयामुळे वस्तूंच्या किंमती कशा वाढत गेल्या आणि पैशांची किंमत कमी होत गेली. लक्षात घ्या की, चलन फुगवट्याचा प्रभाव (Effect) १९३४-३५ पासून सुरू झाला आणि यज्ञाची स्थापना १९३७ च्या आसपास झाली.

एखादी संस्था बँकेत जर मुदत ठेव (Fixed Deposit) ठेवत असेल तर वर्षाकाठी साधारण ८% ते ९% व्याज मिळते आणि चलन फुगवट्यामुळे पैशाची खरेदी करण्याची ही शक्ती कमी होत जाते म्हणजे साध्या शब्दात सांगायचे झाले, तर महागाई वाढत चालली आहे.

सरकार समाज कल्याणाच्या कार्यव्यवहारार्थ खर्च करीत असते. पहिले गोल्ड स्टँडर्ड होते म्हणजे सरकार जेवढी नोट छपाई करीत असे, तेवढे सोने त्यांच्याजवळ असे. परंतु आता सरकार नोट छपाई करीत रहाते. तेवढे सोने मात्र सरकारकडे नसते. त्यामुळे चलनफुगवटा (Inflamation rate) दरवर्षी १५ ते २०% सामान्यत: होत आहे.

आता आर्थिक समस्या उभी रहाते. कारण ८ ते ९% व्याज मिळते आणि महागाई १५ ते २०% वाढते म्हणजे पैशाची किंमत कमी होत चालली आहे. त्यामुळे जर १५% चलन फुगवट्याचा दर असेल आणि ८% व्याज मिळत असेल तर दरवर्षासाठी ७ ते १२% आर्थिक नुकसान होते. अर्थात व्याज ८% मिळत असेल व खर्च १५ ते २०% दरवर्षी अधिक वाढत जातो. ज्या अर्थशास्त्राबद्दल मी एवढ्या गोष्टी सांगितल्या, त्याबाबत प्रिय ब्रह्माबाबांनी सरळ साध्या शब्दात सांगितले की, व्याजाच्यामागे जाऊ नका. आपल्या भाऊबहिणींकडून आपल्याला जो आर्थिक सहयोग मिळतो, ते धन सेवेसाठी उपयोगात आणावे आणि जी बचत होते, ती चल-अचल संपत्ती खरेदी करण्यासाठी लावावी. मुख्य म्हणजे धन हे धनाच्या रूपातच न ठेवता, अचल संपत्ती खरेदी करण्यासाठी वापरावी. या चल-अचल संपत्तीमुळे आपल्याला ईश्वरीय सेवेत संरक्षण प्राप्त होते किंवा सेवेत वाढ होते.

दुसरे उदाहरण, एके काळी असा प्रश्न होता की, यज्ञ कार्याचा विकास माऊंट आबूला करावा की खाली तलहटी, आबू रोड येथे करावा? या विषयावर खूप चर्चा झाली. कारण तोपर्यंत सुप्रीम कोर्टाचे जजमेंट (निर्णय) आले नव्हते की, पहाडी प्रदेशात निर्माण कार्य करायची परवानगी आहे. आदरणीय प्रकाशमणी दादीजींनी मला याबाबत विचारले. तेव्हा मी २-३ दिवस त्याबाबत अभ्यास केला आणि त्यानंतर चार ओळीत उत्तर दिले की, यज्ञाचा विकास तलहटीमध्ये करणे अधिक योग्य राहिल. पण बापदादांची पधरामणी (अवतरण) तलहटीमध्ये व्हावयास हवी. अव्यक्त बापदादा ब्रह्मावत्सांशी मिलन करण्यासाठी तलहटीत येत असतील तर विकास कार्य मग खालीच झाले पाहिजे. आदरणीय गुलजार दादीजी दिल्ली येथे राहत होत्या. दादीजींनी त्यांना पत्र पाठविले. तेव्हा बापदादांनी त्याचे उत्तर दिले की, तलहटी आबूरोडला चांगले स्थान बनले, तर बापदादा तेथे येतील. आबू रोडला यज्ञाचा विकास करावा. बाबांनी आम्हा मुलांना खास असेही श्रीमत दिले की, तलहटीमध्ये जितकी जमीन मिळेल, तितकी विकत घ्यावी; जेणेकरून भविष्यात योग्य रितीने कारभार आबू रोडलाच करता येईल.

अव्यक्त बापदादांनी जमीन खरेदीबाबतची गोष्ट एका अर्थतज्ज्ञाच्या नात्याने सांगितली कारण त्यावेळी आम्ही शांतिवनसाठी प्रथम ११ बिघे जमीन खरेदी केली. (१ बिघा म्हणजे ३०२५ चौरस गज) आणि त्यावेळेस एक बिघ्याचा दर ९०,०००/- रु. होता आणि आज आबूमध्ये एक बिघ्याचा दर काय आहे, हे आपल्या भाऊ-बहिणींना माहित आहे. उदा. दोन वर्षापूर्वी एका भावाला ३०X४०=१२०० चौरस फूट प्लॉटसाठी १२ लाख रुपये मिळत होते आणि आज तर जमिनीचे भाव अधिक वाढले आहेत. जमिनीच्या भावाच्या आधारावर आपण विचार करूया की, शांतिवन, मनमोहिनी कॉम्प्लेक्स, सोलार भूमी, संजय पार्क तसेच तपोवन इत्यादींच्या जमिनी जर आजच्या भावाने घ्यायच्या असत्या तर किती खर्च करावा लागला असता, हे आरशासारखे स्पष्ट आहे.

आपण जर पैसे बँकेत ठेवले असते व त्याच्या आधाराने यज्ञाचा कारभार करीत गेलो असतो तर वस्तूंची भाववाढ होतच

गेली असती व कमाई कमी होत गेली असती आणि सेवा साधने वाढू शकली नसती. प्रिय ब्रह्माबाबांच्या श्रीमताचे पालन आदरणीय दादींनी चांगल्या पद्धतीने केले. ब्रह्माबाबांचे महावाक्य, ''मुलांनो, व्याजाच्या मागे लागू नका. परंतु आर्थिक सहयोग प्राप्तीतून जी धनसंपत्ती मिळते. ती सेवेत लावा आणि बचत केलेल्या धनाद्वारे चल-अचल संपत्ती खरेदी करून, ईश्वरीय सेवेत लावा.'' यामुळे यज्ञाला केवढी मोठी प्राप्ती झाली.

अर्थव्यवस्थेचा कारभार खूप विशाल आहे. उदाहरणार्थ, ब्रह्माबाबांचा आपल्या भागीदाराबरोबर धंदा उत्तम चालला होता. परंतु जेव्हा ब्रह्माबाबांच्या तनात शिवबाबांची प्रवेशता झाली, तेव्हा त्यांनी आपल्या भागीदाराला पत्र लिहिले की, 'अल्फ को मिला अल्लाह, बे को मिली बादशाही, आया तार...हुआ रेल का राही!'

अशा प्रकारे ब्रह्माबाबांनी आपल्या भागीदाराला लिहिले की, ''मी आता या व्यापारातून निवृत्त होऊ इच्छितो. म्हणून धनसंपत्तीचे आपण वाटप करूया.'' तेव्हा त्यांच्या भागीदाराने लिहिले, ''आपल्या इतका मी हिरे-जवाहराच्या कारभारातील जाणकार नाही. म्हणून यातील जे काही पैसे आहेत ते मी ठेवतो आणि हिरे जवाहर आपण ठेऊन घ्या.'' अशाप्रकारे बरोबरीने वाटप झाले. ब्रह्माबाबा व्यापार व अर्थशास्त्रात अनुभवी होते. म्हणून वाटपामध्ये त्यांना जे हिरे-जवाहर मिळाले, ते त्यांनी हळूहळू विकले आणि यज्ञ चालविण्याचा कारभार करीत गेले. पैसे तर पैशाच्या रूपातच राहिले आणि पैशाच्या किंमतीत घट झाली. परंतु हिरे जवाहरांची किंमत वाढतच गेली. त्यांच्या वाढत्या किंमतीच्या आधारावर यज्ञाची पालना होत गेली. असे ही म्हणता येईल की, ब्रह्माबाबांच्या दूरदृष्टीच्या आधारे सिंध-हैदराबाद तसेच कराचीमध्ये यज्ञवत्सांचे पालनपोषण सहजतेने झाले.

ब्रह्माबाबांनी अचल संपत्तीच्या बाबतीतही खूप मोठा कार्यव्यवहार केला. त्यांनी सिंध हैद्राबादमधील जसोदा भवन खरेदी केले होते; जेथे यज्ञाची स्थापना झाली होती. परंतु कराचीमध्ये जेव्हा यज्ञ स्थानांतरीत झाला, तेव्हा बाबांनी कराचीमधील सर्व घरे भाडेतत्त्वावर घेतली आणि हैदराबाद मधील सर्व घरे विकून टाकली. परिणामी जेव्हा कराचीहून यज्ञ भारतात स्थानांतरीत झाला. तेव्हा यज्ञाच्या अचल संपत्तीचे काही नुकसान झाले नाही. कारण तेथे आपल्या मालकीची कोणतीही अचल संपत्ती नव्हती. जेव्हा भारत-पाकिस्तानचे विभाजन झाले, तेव्हा किती तरी सिंधी, मुलतानी, पंजाबी इ. लोकांना पाकिस्तान सोडून भारतात यावे लागले. तेव्हा त्या लोकांना आपली जमीन, घरं ही सोडून द्यावी लागली. त्यात त्यांचे खूप नुकसान झाले. या संदर्भात मात्र ब्रह्माबाबांकडे दूरदृष्टी आणि अर्थनीति होती हे लक्षात येते.

या लेखाचे सार हेच आहे की, अर्थव्यवस्थेच्या संदर्भात ब्रह्माबाबांच्या प्रेरणेचा अवलंब करावा. धनाद्वारा आपली धारणा आणि साधना विकसित करावी. बाबांनी धनाला कधीही माया म्हटले नाही. परंतु जेवढे आवश्यक आहे, तेवढीच कमाई करावी आणि बाकी धन सेवेमध्ये सफल करावे.

(भावानुवाद : बी. के. जयश्री खिलारी, विक्रोळी, मुंबई)

>> पान २१ वरून

हनुमान आकाशमार्गे उड्डान करून लंकेत पोहोचले. तेव्हा सर्वप्रथम शोकवाटिकेत असलेल्या सीतामाईंची त्यांनी भेट घेतली व श्रीरामचंद्रांनी दिलेली अंगठी त्यांना दिली. ती भेटवस्तू पाहाताच सीतामाई प्रसन्न झाल्या व बक्षीस म्हणून हनुमानाला आपल्या गळ्यातील मौल्यवान मोत्यांचा हार भेट दिला. हनुमान तो हार घेऊन झाडावर बसले व त्या हारातील एक एक मणी चावून तो खाली फेकू लागले. तेव्हा सीतामाईंनी असे करण्यामागील कारण त्यांना विचारले. तेव्हा हनुमान म्हणाले की या मण्यांमध्ये राम आहे का, हे मी बघत होतो. परंतु त्यांच्यात कुठेही राम आढळून न आल्याने, माझ्यासाठी त्यांची किंमत काहीच नाही. तेव्हा सीतामाईंना हनुमानाचे रामाविषयीचे प्रेम लक्षात आले. ब्राह्मण जीवनामध्ये आपल्याला सुद्धा ह्याच विशेषतांना आत्मसात करण्याची गरज आहे. ईश्वराचा सत्य परिचय तसेच त्याच्या कार्याची महानता जेव्हा समजते तेव्हा भले आपणामध्ये कितीही अवगुण असले तरी आपण आपला हातभार ह्या कार्यामध्ये लागतो. **परंतु जर ईश्वराद्वारे मिळालेल्या प्रत्येक आज्ञेचे पालन आपण दृढ विश्वासाच्या आधारावर करत गेलो तरच आपल्यामध्ये ईश्वरीय शक्तीचा संचार होईल व त्या बलाद्वारे आपण आपल्या सर्व कमजोरींपासून मुक्त होऊ. आपण महावीर बनू.**

अशाप्रकारे संगमयुगावर केलेला पुरुषार्थ अनेकानेक रूपाने वर्णन केलेला दिसून येतो. गणेश, हनुमान, अंगद.... हे कोणी दुसरे नाहीत तर संगमयुगातील आपल्या श्रेष्ठ कर्तव्याची ती यादगार आहे.

कर्मधर्मसंयोग व राजयोग

– ब्र.कु. डॉ. दिलीप कौंडिण्य, एम.डी., ठाणे

फलस्वरूप माझा ठाम विश्वास बसला की वर्तमान समयी साक्षात निराकार शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीराचा आधार घेऊन, आपल्याला अगदी सुस्पष्ट स्वरूपात आध्यात्मिक ज्ञान देत आहेत, त्याचबरोबर हेही बुद्धीला पटले की परमेश्वर एकच आहे तो अशरीरी, ज्योतिस्वरूप आहे व तो अजन्मा आहे.

मराठी माणूस बऱ्याचदा बोलून जातो 'कर्मधर्मसंयोगाने पार पडले बुवा.' पण या वाक्प्रचाराच्या मागे दडलेले अध्यात्म कोणाच्याही लक्षात येत नाही. आपल्याला असे वाटत असते की कर्माचा सिद्धांत भगवद्गीतेत दिला आहे, धर्म म्हणजे काय हे शास्त्र व उपनिषद् सांगतात व संयोग म्हणजे भगवंताच्या कृपेने प्राप्त योग आहे. अशाच प्रकारे आपला अंधविश्वास व भ्रामक कल्पना अपुऱ्या ज्ञानामुळे किंवा अज्ञानामुळे निर्मित असतात. परंतु माझा अनुभव असा आहे की मी जेव्हा प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या कुलाबा (मुंबई) सेवाकेंद्रात सात दिवसांचा कोर्स केला. तेव्हा माझ्या मनातील सर्व भ्रम व अंधविश्वास दूर झाला. (या संस्थेची १४० देशात सेवाकेंद्रे आहेत. वाचकांनी जवळच्या सेवाकेंद्राला भेट देऊन, ईश्वरीय ज्ञान अवश्य प्राप्त करावे.) त्यानंतर मी रोज सेवाकेंद्रावर जाऊन, ईश्वरीय ज्ञानमुरलीचे अध्ययन करू लागलो. फलस्वरूप माझा ठाम विश्वास बसला की वर्तमान समयी साक्षात निराकार शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीराचा आधार घेऊन, आपल्याला अगदी सुस्पष्ट स्वरूपात आध्यात्मिक ज्ञान देत आहेत, त्याचबरोबर हेही बुद्धीला पटले की परमेश्वर एकच आहे तो अशरीरी, ज्योतिस्वरूप आहे व तो अजन्मा आहे. तसेच देहधारी श्रीकृष्ण, श्रीराम किंवा शंकर परमेश्वर नाहीत तर देवात्मा आहेत. हिंदू धर्म सोडून अन्य धर्मात परमात्मा म्हणजे दिव्य प्रकाश (Divine Light) आहे, असे मानले जाते. त्यामुळे अशरीरी, ज्योतिस्वरूप, परमात्मा शिव, सर्व आत्म्यांचा परमपिता, परमशिक्षक व सद्गुरू आहे, हे माझ्या लक्षात आले. मुख्य म्हणजे संपूर्ण कल्प हे केवळ पाच हजार वर्षाचे आहे हे सत्य समजल्याने, मनाला फार मोठा दिलासा मिळाला.

वर्तमान कलियुगातील विक्राळ परिस्थिती आपण सर्वजण अनुभवत आहोत. कलियुगालाच शास्त्रात 'रौरव नर्क वा दु:खधाम' असेही म्हटले आहे. त्यामुळे 'सुख पाहता जवापाडे, दु:ख पर्वताएवढे' अशी परिस्थिती सर्वत्र दिसून येते. परिणामी बहुतेक लोक हवालदिल झाले आहेत, जीवनाला कंटाळले आहेत. अशा परिस्थितीत शास्त्रात दिल्याप्रमाणे कलियुग जर अजून ४०००० वर्षे चालणार असेल तर जगाचे काय हाल होतील, याची कल्पनाच करवत नाही.

त्यामुळे मला जेव्हा हे ईश्वरीय ज्ञान प्राप्त झाले की आता लवकरच कलियुग जाणार आहे व सत्ययुग येणार आहे, तेव्हा मला खूप आनंद वाटला. यापेक्षाही अधिक आनंदाची गोष्ट म्हणजे आपला भारत एक अविनाशी खंड आहे. तो कधीच विनाश पावत नाही. कारण अविनाशी शिव परमात्म्याची ती अवतरणभूमी आहे. प्रत्येक कल्पात (अर्थात ५००० वर्षात) परमात्म्याचे दिव्य अवतरण भारतातच होते. कलियुगाच्या अंती महाभारी विनाशाच्या वेळी अन्य भूखंड

सर्वप्रथम मी आत्मा ज्योतिर्बिंदू स्वरूप आहे. दुसरी गोष्ट म्हणजे परमात्मा शिव पिता देखील ज्योतिर्बिंदू स्वरूप आहे. त्यांची निरंतर आठवण करावी. तिसरी गोष्ट मला रोज ज्ञानमुरलीचे श्रवण अथवा वाचन करायचे आहे. चौथी गोष्ट म्हणजे मनसा-वाचा-कर्मणा सेवा करून, मला परमात्म्याची प्रत्यक्षता करायची आहे.

मात्र समुद्रात बुडतात. एका मुरलीमध्ये शिवबाबांनी हेही सांगितले आहे की अंतिम समयी यातायातच्या सर्व साधनांची वाताहात झालेली असेल. फक्त तीच ट्रेन किंवा विमान चालेल ज्यात श्रीमताप्रमाणे श्रेष्ठ पुरुषार्थ करणारे ब्रह्माकुमार किंवा ब्रह्माकुमारी असतील. ते सर्वच्या सर्व अगदी सहजतेने व सुरक्षितपणे मधुबनमध्ये पोहचू शकतील. अन्य लोकांना मात्र विक्राळ परिस्थितींना तोंड द्यावे लागेल. धर्मराजाकडून शिक्षा भोगावी लागेल. तात्पर्य म्हणजे ईश्वरीय मत वा श्रीमत म्हणजेच धर्म व मुरली म्हणजेच परमेश्वराच्या सूचना, जर कळल्या नाहीत तर अधर्माचे आचरण घडते. एकाग्रचित्ताने शिवबाबांची आठवण केल्यास, जन्म-जन्मांतरीचे विकर्म भस्म होतात. परिणामत: मागील कर्म भोगानुसार जर सुळावर चढायचे असेल तर ते काट्यावर निभावेल आणि जर फक्त काटा टोचायचा असेल तर तोही लागणार नाही. मुरलीतील या महावाक्यांचा पुरेपूर अनुभव मी स्वत: मागील २१ वर्षात घेतला आहे. परमेश्वराचे निरंतर ध्यान करण्याची प्रक्रिया देखील अगदी सहज व आपोआप होत जाते. कामजीत, क्रोधजीत, मोहजीत वा मायाजीत होणे अगदी सहज आहे, असे वाटायला लागते. धर्माप्रमाणे चालून धर्मात्मा, पुण्यात्मा वा देवात्मा होणे म्हणजे काय हे स्पष्टपणे कळते. काही वर्षातच भक्तीचे संस्कार मिटायला सुरुवात होते. अगदी ३३ कोटी देवांपैकी आपण एक आहोत; असा ठाम विश्वास निर्माण होतो. पूजा, अर्चना, आराधना, आरती किंवा उपासना आपण आपलीच करीत आहोत, असे वाटू लागते. अलौकिक ब्राह्मण जीवनात कोणतीच वस्तू अप्राप्त नाही, याचा प्रत्यय यायला लागतो. संकल्प सिद्धी वा वाचा सिद्धी यांचे देखील अनुभव यायला लागतात. संदेश देण्याकरिता मोबाईल किंवा दूरध्वनीची आवश्यकता कमी व्हायला लागते. तसेच मानवी शरीर हे आत्म्याचा रथ असल्यामुळे, सर्वांत आधी शरीराच्या विभिन्न व्याधी नाहीशा होतात. (माझे स्वत:चे सात असाध्य रोग पूर्णपणे बरे झाले.) सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मन सदैव अपार सुख, शांती, आनंद व प्रेम यांनी भरून जाते. असे संगमयुगी परमसुख प्राप्त करण्यासाठी फक्त चार गोष्टी लक्षात ठेऊन, त्यानुसार आचरण करावयाचे आहे.

सर्वप्रथम मी आत्मा ज्योतिर्बिंदू स्वरूप आहे. दुसरी गोष्ट म्हणजे परमात्मा शिव पिता देखील ज्योतिर्बिंदू स्वरूप आहे. त्यांची निरंतर आठवण करावी. तिसरी गोष्ट मला रोज ज्ञानमुरलीचे श्रवण अथवा वाचन करायचे आहे. चौथी गोष्ट म्हणजे मनसा-वाचा-कर्मणा सेवा करून, मला परमात्म्याची प्रत्यक्षता करायची आहे. विश्वातील सर्व धर्माचे यथार्थ सार या चार गोष्टीत सामावलेले आहे. मनसा सेवा प्रभावीरित्या करण्यासाठी कोणताही एक स्वमान घेऊन त्याचेच मनन-चिंतन जागृत अवस्थेत लागोपाठ २१ दिवस केल्यास, आपण त्या स्वमानाचे स्वरूप होतो, असे माईण्ड बॉडी मेडिसिन ही अद्यावत शाखा सांगते. अशाप्रकारे स्वरूप बनल्यानंतरच, त्या दिव्य गुणामार्फत प्रभावी मनसा सेवा घडते. स्वमानाच्या स्वरूपाची प्रकंपने विश्वातील सर्व आत्म्यांपर्यंत पोहोचू लागतात. मनसा सेवेचा प्रयोग आपल्या संबंध-संपर्कात येणाऱ्या आत्म्यांवर करावा. त्यांचे आसुरी संस्कार जर परिवर्तन झाले तर समजून येईल की आपली मनसा सेवा यशस्वी झाली आहे.

तात्पर्य म्हणजे श्रीमताप्रमाणे कर्म केल्यास श्रेष्ठ कर्म घडते कारण ते परमेश्वरी धर्माप्रमाणे असते. अशाप्रकारे आपल्या जीवनातील संयोग म्हणजेच चांगला योग हा आपल्या कर्मावर निर्धारीत असतो. म्हणजेच माणसाला आपले भाग्य लिहिण्याची कर्मरूपी लेखणी परमेश्वराने, त्याच्याच हातात दिलेली आहे.

जन्मजन्मांतराची कर्मबंधने नष्ट करूया

व जन्मजन्मांतर जीवनमुक्तीचा अनुभव करूया (भाग १)

– ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे

असे म्हटले जाते की, कर्मांची गती गहन आहे, परंतु त्यापेक्षाही कर्मबंधनाची गती अधिक गहनच नव्हे तर अत्यंत क्लिष्ट व गुंतागुंतीची आहे. कोणत्या काळातील व कोणत्या जन्मातील कर्मबंधन पुढील कोणत्या काळात, कोणत्या जन्मात व कोणत्या प्रसंगी चुकतू होईल हे सांगता येणार नाही.

पुरुषोत्तम संगमयुगावर जोपर्यंत आत्मा स्वपुरुषार्थाने जन्मजन्मांतरीच्या कर्मबंधनातून मुक्त होत नाही. तोपर्यंत तो संपूर्ण पावन बनू शकत नाही. तसेच जीवनमुक्तीचा ही अलौकिक अनुभव करू शकत नाही, ह्या कर्मबंधनांचे स्वरूप हे भिन्न-भिन्न असणार आहे. असे म्हटले जाते की, कर्मांची गती गहन आहे, परंतु त्यापेक्षाही कर्मबंधनाची गती अधिक गहनच नव्हे, तर अत्यंत क्लिष्ट व गुंतागुंतीची आहे. कोणत्या काळातील व कोणत्या जन्मातील कर्मबंधन पुढील कोणत्या काळात, कोणत्या जन्मात व कोणत्या प्रसंगी चुकतू होईल हे सांगता येणार नाही. या अनुषंगाने पुढील एक बोधप्रद कथा पाहूया.

फार वर्षापूर्वी एक प्रामाणिक व्यापारी आपला किमती माल एका शहरात विकून आपल्या गावी प्रस्थान करीत होता. प्रवास करता करता तो एका खेडेगावात आला. त्या ठिकाणी खूपच रात्र झाल्याने येथेच कोठेतरी मुक्काम करावा, असे त्याने ठरविले. समोरच त्याला एका शेतकऱ्याचे घर दिसले. त्या शेतकऱ्याकडे जाऊन त्याच्या घरी मुक्काम करण्याचा मनोदय त्याने व्यक्त केला. शेतकऱ्यानेही त्याचे स्वागत करून 'तुम्हाला एक रात्र मुक्काम करावयास काहीच हरकत नाही' असे सांगितले. व्यापाऱ्याने रात्रीचे जेवणही शेतकऱ्याच्याच घरी केले. जेवण झाल्यावर त्याच्या झोपण्याची सोय शेतकऱ्याने केली. व्यापारी प्रवासाने दमला असल्याने त्याला लवकरच गाढ झोप लागली. शेतकरी पती-पत्नीच्या असे ध्यानात आले की, व्यापाऱ्याजवळ माल विक्रीचे लाखो रुपये आहेत. ते जर आपल्याला मिळाले तर आपली गरीबी कायमची दूर होईल. अर्थात त्यांना त्याच्या पैशाविषयी लोभ निर्माण झाला आणि चर्चेशेवटी असे ठरले की, व्यापाऱ्याला झोपेतच ठार करून त्याची सर्व रक्कम हस्तगत करावयाची. ठरल्याप्रमाणे शेतकऱ्याने व्यापाऱ्याच्या डोक्यावर कुऱ्हाडीचा एक वार करताच तो गतप्राण झाला. त्याचा मृतदेह शेतकऱ्याने रातोरात आपल्या शेतात पुरून टाकला.

व्यापाऱ्याचे लाखो रुपये मिळाल्याने त्याची आर्थिक स्थिती सुधारली. त्या पैशावर त्याने नवीन घरही बांधले आणि आपल्या पत्नीसह तो आनंदाने त्या घरात राहू लागला. काही दिवसांनी त्यांना एक मुलगाही झाला. परिणामी ते दोघे अधिकच सुखावले. परंतु त्यांचा तो मुलगा ऐन पंचविशीत आल्यानंतर त्याला कसला तरी मोठा दुर्धर आजार झाला. काही केल्या त्या आजाराचे निदान कोणत्याच डॉक्टरला होईना. आजारामुळे तो मुलगा अत्यंत कृश झाला होता. आपल्या मुलाची झालेली हालत पाहून शेतकरी अत्यंत कष्टी व हवालदिल झाला. अनेक प्रकारचे औषधोपचार करूनही त्याला काही बरे वाटेना. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार शेतकऱ्याने त्याला रुग्णालयात दाखल केले. त्याच्यावर उपचार करता-करता शेतकरी निर्धन झाला होता. शेवटी त्याला त्याचे घरही विकावे लागले आणि तो आपल्या पत्नीसह एका झोपडीत राहू लागला. शेतकरी दररोज मुलाच्या सेवेअर्थ रुग्णालयात जात होता. एके दिवशी वडिलांना त्या मुलाने सांगितले की, ''बाबा, आता माझे काही खरे नाही. तुम्ही मला आपल्या घरी घेऊन चला.'' त्याच्या अंतिम इच्छेनुसार शेतकरी त्याला घरी घेऊन आला. दोन चार दिवसांनी त्याने आई वडिलांना आपल्याजवळ बोलावून घेतले व मला तुमच्याशी काही महत्त्वाचे बोलावयाचे आहे असे तो म्हणाला. शेतकरी अतिशय दु:खद स्वरात उद्‌गारला ''सांग बाळ तूला काय सांगावयाचे आहे'' **त्यावर तो मुलगा म्हणाला, ''तुमचा हा मुलगा पूर्वजन्मी एक मोठा व्यापारी होता. त्या व्यापाऱ्याला तुम्ही ठार करून त्याचे पैसे लुबाडले होते. ते सर्व पैसे तुम्ही माझ्या उपचाराकरता खर्च केले आहेत. अशाप्रकारे माझे पैसे मी तुमच्याकडून वसूल केले आहेत.** गेल्या जन्मी मरताना मला क्षणिक यातना झाल्या. परंतु माझे आजारपण व थोड्याच वेळात होणारा मृत्यू पाहून तुमच्या मनाला किती यातना होत आहेत, हे मी जाणतो. आता तुमचा माझा कोणताच हिशोब राहिलेला नाही'' असे म्हणून त्याने आपला प्राण सोडला. अशाप्रकारे शेतकऱ्याने निर्माण केलेले कर्मबंधन व्यापाऱ्याने त्याच्याच घरात पुनर्जन्म घेऊन चुकतू केले. बंधुनो, आत्म्याआत्म्यातील कर्मबंधनांची ही गुंतागुंत मानवी बुद्धिच्या पलीकडील आहे.

ज्याप्रमाणे दोन मोठ्या लांबीचे धागे एकमेकात अडकून गुंता निर्माण झाल्यानंतर तो सोडविणे अत्यंत क्लिष्ट असते, तद्वतच जन्म जन्मांतरीच्या कर्म बंधनांचा गुंताही अत्यंत क्लिष्ट असल्याने सर्व शक्तिवान परमात्म्याच्या मदतीनेच तो आपणा सर्वांना सोडवायचा आहे. त्यासाठीच त्याने संगमयुगाची निर्मिती केली आहे. ही कर्मबंधने ज्याप्रमाणे लौकिक परिवारात, भिन्न संबंधियांच्यामध्ये व समाजातील अनेक मनुष्य आत्म्यांशी निर्माण झालेली असतात. त्याचप्रमाणे ती अलौकिक परिवारातील काही आत्म्यांशीही निर्माण झालेली असतात. म्हणून कर्मबंधन मुक्तीच्या युगात सर्व कर्मबंधने ज्ञान, योग, आपली श्रेष्ठ आत्मिक स्थिती व बुद्धी कौशल्याच्या आधारे नष्ट करून केवळ आत्मिक प्रेम असलेला निर्मोही संबंध जोडावयाचा आहे. कर्मसंबंधात ना दु:ख घ्यावे लागते ना दु:ख द्यावे लागते. अर्थात श्रीमतानुसार कर्म करून सुख द्यावयाचे आहे व सुख घ्यावयाचे आहे. केवळ सुखांची देवाण घेवाण झाली तरच आपण कर्मबंधन मुक्तीचा व जीवनमुक्तीचा अनुभव प्राप्त करून परमानंद लुटू शकतो.

संगमयुग कर्मबंधन मुक्त होण्याचे व त्याची समाप्ती करण्याचे युग असल्याने, कर्मबंधनाचा चेंडू ज्यावेळी आपल्याकडे येईल, त्यावेळी तो पुन्हा संबंधित आत्म्याकडे टोलवायचा नसून, त्याला केवळ थोपवून धरावयाचा आहे. अर्थात कोणी आपल्याशी कटुवचन बोलल्यास, आपणही त्याला कटुवचन बोललो तर कर्मबंधन चुकतू न होता ती

>> पान ३३ वर

मुलगा म्हणाला, ''तुमचा हा मुलगा **पूर्वजन्मी** एक मोठा **व्यापारी** होता. त्या व्यापाऱ्याला तुम्ही **ठार** करून त्याचे पैसे **लुबाडले** होते. ते सर्व पैसे तुम्ही **माझ्या उपचाराकरता** खर्च केले आहेत. **अशाप्रकारे** माझे पैसे मी **तुमच्याकडून वसूल** केले आहेत.

भारतीय समाजातील दुर्लक्षित व वंचित घटक- तृतीयपंथीय

-ब्र.कु. जयश्री खिलारी, विक्रोळी (मुंबई)

> कधी-कधी संस्कार परंपरा व अज्ञानाचा माणसावर जर खोलवर पगडा असेल तर तो मानवीय मूल्ये कळत वा नकळत पायदळी तुडवित, दुसऱ्या मानवाचे जीवन इतके कठीण करतो की, त्याला जगणे सुद्धा मुश्कील होते. तेव्हा समानतेची मूल्ये ही राज्यघटनेच्या पुस्तकातच राहतात.

आपला भारत देश हा आध्यात्मिक मुल्यांनी संपन्न असला तरी, १९५० साली कार्यान्वित केलेल्या राज्यघटनेच्या आधारे देश चालत आहे. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीने साधारण ६० देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास करून भारतीय नागरिकांचे जीवन सुकर, सुरक्षित, सुखी रहावे यासाठी विचारपूर्वक नियम-मर्यादा-अधिकार-कर्तव्ये याबाबत खूप सुंदर मांडणी केलेली आहे. माणुसकीच्या दृष्टिकोनातून संपूर्ण राज्यघटना वा संविधान आहे आणि त्याच्यावरती श्रेष्ठ कुणी नाही. कोणी कितीही उच्च श्रेष्ठ असला मग कोणत्याही क्षेत्रातला असो, त्याने जर राज्यघटनेशी प्रतिकूल वर्तन केले तर तो दंडास पात्र ठरतो. मग तो धर्म-अध्यात्माशी संबंधित का असेना. राज्यघटनेचा अभ्यास करताना लक्षात येते की, माणसाला माणूस म्हणून शांत, सुखी कसे जगता येईल याचा किती बारीक विचार केला आहे. अनेकांच्या जन्माअगोदरच राज्यघटना कार्यान्वित असल्यामुळे त्याची इतकी जाणीव होत नाही.

कधी-कधी संस्कार परंपरा व अज्ञानाचा माणसावर जर खोलवर पगडा असेल तर तो मानवीय मूल्ये कळत वा नकळत पायदळी तुडवित, दुसऱ्या मानवाचे जीवन इतके कठीण करतो की, त्याला जगणे सुद्धा मुश्कील होते. तेव्हा समानतेची मूल्ये ही राज्यघटनेच्या पुस्तकातच राहतात.

ईश्वरीय ज्ञानामध्ये ती तमाम मूल्ये आहेत जी राज्यघटनेमध्ये लिहिलेली आहेत. ईश्वरीय ज्ञान आपल्याला जात, धर्म, भाषा, नव्हे तर लिंग भेदाच्याही पलीकडे घेऊन जाते. परिणामस्वरूप मग आत्मियता ही सर्व मूल्यांच्या सार स्वरूपात दरवळू लागते आणि त्या आत्मियतेचा अनुभव घेत आपण मानव-महामानव-देवता बनण्याच्या पायऱ्या चढू शकतो. आपल्याला जेव्हा, जसे हवे, तसे वागू शकतो. अगदी सहजतेने जीवन पुढे नेऊ शकतो.

परंतु ज्या देहात समान अधिकाराने सर्वांनाच जगण्याचा अधिकार आहे, तोच जगण्याचा कुणाचा अधिकार जर माणसानेच हिरावला तर? हो अगदी खरे आहे, समाजामध्ये आज तृतीयपंथीय माणसे आहेत. त्यांचा जगण्याचा अधिकारच जणू आपण नाकारतो आहोत. ईश्वर सांगतो की तुम्हाला अबला, अहिल्या, कुब्जा, गणिकांचा उद्धार करायचा आहे आणि त्यात हे तृतीयपंथीय सुद्धा येतात...

नुकताच विक्रोळी सेवाकेंद्राच्या शांतीवनात, तृतीयपंथीयांसाठी तिळगूळ समारंभ आयोजित करण्याचे धैर्य, संचालिका बी.के. निलिमा बहेनजी यांनी दाखवून राज्यघटनेचा, नाहीतर संपूर्ण मानवतेचा सन्मान केला. या निमित्ताने एक नवा दृष्टिकोन जन्माला आला की, ही सुद्धा आपलीच भावंडे, एका ईश्वराची मुले आहेत. आपल्या सारखाच त्यांना जगण्याचा व ईश्वराच्या घरी येण्याचाही अधिकार आहे. हे आपल्या समाजाचे अविभाज्य परंतु दुर्लक्षित अंग आहे. कळत-नकळत त्यांच्यावर समाजाकडून अज्ञानवश अन्याय होत आहे.

आम्हाला जगात स्त्री व पुरुष या दोनच

जाती माहित आहेत. किंबहुना आम्ही तेच स्वीकारले आहे व तृतीयपंथीय ही तिसरी जात हे सत्य आहे, हे सोयीस्करपणे अज्ञान व गैरसमजामुळे विसरलो आहोत. ही मंडळी जेव्हा निमंत्रणावरून शांतिवनला आली. तेव्हा त्यांना एका नव्या दुनियेत प्रवेश केल्याचा अनुभव झाला. संपूर्ण पायांना, शरीराला, मनाला क्षणात पंख लागून तरंगल्याचा त्यांना भास होऊ लागला. सगळीकडून मिळणाऱ्या रूहानी दृष्टीमुळे त्यांचा आत्मसन्मान फुलू लागला. आपल्या अस्तित्वाची दखल कुणीतरी घेत आहेत. ते ही सन्मानपूर्वक, याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. पण हे सारे खरंच ना, असा प्रश्नही त्यांच्या मनात घोटाळतांना दिसत होता.

खरं तर बी. के. निलिमा बहेन, बी.के. मिनल बहेन सहित आम्हां सर्वांना हा नवीन, रोमांचक व आव्हानपूर्ण अनुभव होता. कारण आमच्यावरही पूर्वापार झालेल्या संस्कारांचा पगडा होताच परंतु आम्ही ईश्वरीय ज्ञान-योगाच्या शक्तीने स्वत:ला आत्मियतेने भरपूर करतांच, चुकीच्या मान्यता आमच्या मनातून दूर झाल्या. ते सारे (तृतीयपंथीय) समीप आल्याने त्यांना समजून घेणे सोपे गेले. हा मानवता व राज्यघटनेचा विजय होता. आमच्या विभागात सारे नागरिक गंभीरतेने विचार करू लागलेत व या धाडसी व मानवतावादी उपक्रमाचे कौतुक करू लागले. जे काम त्यांनी करायचे ते धैर्य आपण दाखविले. त्यांना बोलतं केल्यानंतर आम्हाला त्यांच्याबाबत बरीच माहिती मिळाली. अनेक जण उच्च शिक्षित, गुणसंपन्न व चांगल्या घरांमधून होते. परंतु त्यांना त्यांच्या प्रत्यक्ष आईवडील,

शरीर पुरुषाचे तर शारीरिक हालचाली सहजपणे स्त्रियांप्रमाणे होतात किंवा शरीर स्त्रीचे असेल तर पुरुषाप्रमाणे आपसूक वागू लागतात. त्यांचे त्यांनाही कळत नाही. तर काहींच्या शरीरातच अनैसर्गिक बिघाड होतो आणि त्यांच्या परिवाराला ते स्वीकारणे कठीण जाते.

परिवाराने समजून न घेतल्यामुळे त्यांचे जीवन इतके कठीण बनले की त्यांना घर सोडण्याशिवाय पर्यायच राहिला नव्हता. जेथे रक्ताची नाती दुश्मन बनतात तेव्हा ते समाजाकडून काय अपेक्षा ठेवणार?

त्यांच्याकडून समजले की, तृतीयपंथीय हे निसर्गाच्या चुकीमुळे शरीरात काही बिघाड झाल्याने त्या आत्म्यांना कसे जगावे हेच समजत नाही. शरीर पुरुषाचे तर शारीरिक हालचाली सहजपणे स्त्रियांप्रमाणे होतात किंवा शरीर स्त्रीचे असेल तर पुरुषाप्रमाणे आपसूक वागू लागतात. त्यांचे त्यांनाही कळत नाही. तर काहींच्या शरीरातच अनैसर्गिक बिघाड होतो आणि त्यांच्या परिवाराला ते स्वीकारणे कठीण जाते. कारण तृतीयपंथीयांना समाजात हीन समजण्याचा संस्कार परंपरागत आलेला असल्याने, ते घरामधूनच, आपल्या भावंडांकडूनही नाकारले जातात. अशावेळी त्यांचा आत्मा काय म्हणत असेल? याकडे पद्धतशीर दुर्लक्ष करून, परिवार आपला 'अहम्' जोपासत, समाजात आपली काय पत राहिल या विचाराने, त्या मुलीला वा मुलाला जणू जगणेच नाकारतात. तृतीयपंथीय या सृष्टीवर कायम आहेत. अगदी महाभारतातही त्यांचा उल्लेख आहे. पण म्हणतात की, जेव्हा ब्रिटीशांचे राज्य आले तेव्हा त्यांनी तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहातून अलगद बाजूला केले व आपणही पुढे तेच सुरू ठेवलं. त्यांचं जणू अस्तित्व नाकारले.

स्त्री-पुरुष यांच्या शरीरातील बदल आम्ही स्वीकारले पण तृतीयपंथीयांना न स्वीकारल्यामुळे, त्यांचे कुठे म्हणजे कुठेही अस्तित्वच राहिले नाही. **मात्र आता एवढ्यात, त्यांच्या प्रयत्नांमुळे सरकारने स्त्री-पुरुष याबरोबर तृतीयपंथीय या वर्गाच्या अस्तित्वाला मान्यता दिली आहे. तसेच त्यांना मतदानाचा अधिकार आता मिळू लागलाय. पण तरीही काय सन्मानाने त्यांना कुठे सामावून घेतोय कां आपण?** काय म्हणते आपल्या आतील मानवता? त्यांनी जणू काही फार मोठे पापच केले आहे, अशीच समाजाची त्यांच्या प्रति हीन भावना आहे. त्यांना ट्रेनमध्ये कोणत्या डब्यात चढावे हा प्रश्न पडतो. कुणाच्या शेजारी बसावे असाही प्रश्न पडतो. चारी बाजूने त्यांना नाकारण्याची भावना दिसते. त्यामुळे त्यांना ना कुणी धुणीभांडी करायला देतात. त्यांच्याप्रति असलेल्या भयापोटी त्यांना मुलांना सांभाळणे वा शाळेत सोडणे अशीही कामे मिळत नाही. त्यांना नोकऱ्या मिळतच नाहीत. असली तर सोडणे भाग पडते. स्वत:च्या घरातून खाली

तृतीयपंथीयांना ते जे आहेत, जसे आहेत हे समजून घेतल्यावर, ते ही एक आत्मा आहे हे स्वीकारताच त्यांच्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलून जातो; त्यांच्यासाठी आपण उद्धारमूर्त बनतो.

हात बाहेर पडावे लागल्यामुळे, त्यांना भिकारी होऊन जगण्यापलीकडे पर्यायच उरत नाही. कोणताही गुन्हा न करताही ते जीवनभर सजा भोगत असतात. साधारण माणसाप्रमाणे त्यांनाही विचार, भावना असतात. त्यांनाही आपुलकी, हवी असते. आपण कुत्र्या मांजरांवर ही प्रेम करतो. पण तेवढेही त्यांच्या नशिबात नसते. शरीरातील अनैसर्गिक बिघाडापायी त्यांना लहानपणापासून म्हणजे घरातून, शेजाऱ्यांकडून, शाळेतून, मित्रमैत्रिणींकडून, अनोळखी लोकांकडून, चुकून कामधंदा, नोकरी करीत असले तर तेथे वारंवार अपमान व शोषणाचा अनुभव येत राहिल्याने या जगात राहूनच, हेच जग सोडायला आपण सारे त्यांना भाग पाडीत असतो. आणि मग ते सारे समदु:खी एक होऊन आपला कुठेतरी समूह करून गरीबासारखे राहू लागतात. आता त्यांचाही आपला समाज निर्माण झाला आहे. जो विश्वव्यापी आहे. त्यांची ही संमेलने भरतात. तेव्हा विश्वातील अनेक अनुभवी, जुने तृतीयपंथीय नवीन येणाऱ्यांना जगण्याचे बळ, आनंद व आपलेपणाचा अनुभव देतात.

अनेकानेक संस्था या लोकांसाठी काम करीत असल्या तरीही, आपण ईश्वरीय परिवार जो आत्मसन्मानाचा अनुभव त्यांना देणार आहोत व त्यांना ईश्वरीय ज्ञानाजवळ आणणार आहोत. तसं कुणीही करू शकणार नाहीत. त्यांच्या जीवनातही निश्चितच श्रेष्ठ परिवर्तन येईल असे परमात्मा तर वारंवार सांगत असतात. पण अजूनही आपण त्याबाबतीत कार्यान्वित होत नाहीत. कारण आपल्यावर ही त्यांच्या बाबतच्या असलेल्या अज्ञानाचा पगडा आहेच की!

तृतीयपंथीयांना ते जे आहेत, जसे आहेत हे समजून घेतल्यावर, ते ही एक आत्मा आहे हे स्वीकारताच त्यांच्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलून जातो; त्यांच्यासाठी आपण उद्धारमूर्त बनतो. आपल्या वागण्याचा, स्वीकारण्याचा परिणाम त्यांच्यावरच नाही; परंतु समस्त समाजावरच पडणार आहे. आपण सन्मान देऊ लागलो तर ते ही आपला दृष्टिकोन बदलू लागतील. **ज्यांना कुणाला मदत करायची नसेल तर नका करू पण त्यांना झिडकारणे, अपमानित करणे हे पाप नाही काय? मदत करायची नसेल तर, अपमान न करताही बोलता येईल. पण एक लक्षात घेतले पाहिजे की त्यांना कुणी मदतच केली नाही तर, मग काय त्यांनी आत्महत्याच करावी का?** त्यांना ही जगावंस वाटते. पण पैसे त्यासाठी हवे असल्याने, नाईलाजाने पैसे मागण्यासाठी त्यांना समाजात हात पसरावा लागतो. त्यासाठी त्यांना खूप आंतरिक वेदना सहना कराव्या लागतात. कारण अनेक जण भरल्या घरातून रस्त्यावर आलेले आहेत. केवळ निसर्गाने अवकृपा केली म्हणूनच.

आपण समाजाचा एक भाग म्हणून त्यांना प्रथम आदराने स्वीकारावे. ते सुद्धा स्वतंत्र भारताचे नागरिक असून आपले व त्यांचे हक्क व अधिकार समानच आहेत. त्यांच्यातील मानवतेचा आदर करून, त्यांचे जीवन कसे सोपे होईल. याचा विचार करावा. त्यांना नैतिक बळ, पाठिंबा द्यावा. **समाजात लुळे, लंगडे असल्यास आपण त्यांना आधार देतो ना! समाजात चांगले-वाईट, गरीब-श्रीमंत असतात. तसे तेही असतात. म्हणून आपण त्यांचे अस्तित्व नाकारणे म्हणजेच आध्यात्मिकता नाकारणे होय.**

त्यादिवशीच्या कार्यक्रमात अनेक देखण्या स्त्रिया होत्या, थोडे पुरुषही होते. पण त्यांच्यात दोन लावण्यवती होत्या. त्यांचे सौंदर्य पाहून वाटले की, निसर्गाने कसा यांच्यावर अन्याय केला. आता या मुली जर घरून, शाळा-कॉलेज, नोकरीच्या ठिकाणी अपमानीत, शोषित झाल्या तर यांना कुठले जीवन जगण्याचे पर्याय राहतील? तेव्हा काही उच्चशिक्षित तृतीयपंथीय, कुठेही कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असतील तर सन्मानाने त्यांना सहकार्य करावे. त्यांच्या सान्निध्याने काही नुकसान नाही. पण आपल्या सान्निध्याचा नक्कीच त्यांच्यावर प्रभाव पडून, ते समाजाच्या मुख्य प्रवाहात एक असा घटक बनतील जो सारे अधिकार व हक्क प्राप्त करण्यास लाभार्थी आहे. अगदी

ईश्वरीय अधिकार सुद्धा त्यांचा जन्मसिद्ध अधिकार आहे.

आपल्या ईश्वरीय परिवारात तर आपल्या ज्ञानयोग बलाच्या तसेच कला-गुण-शक्तीच्या धारणेने अशी मंडळी, नॉर्मल म्हणविणाऱ्या ईश्वरीय वत्सांना ही मागे टाकतील यात शंका नाही. कारण तशी ईश्वराची महावाक्ये आहेत. अहिल्या, कुब्जा, गणिकासुद्धा देवता बनू शकतील. अगदी आपल्याही ईश्वरीय परिवारात जर कुणामध्ये काही वेगळेपण जाणवले तर त्याचा फार बाऊ न करता, फार आश्चर्य न करता, उलट अधिक सन्मानाने मनातल्या मनात दाद द्यावी की, किती भाग्यवान, बहादूर आत्मा जिने किंवा ज्याने ईश्वराला आपले बनविले आहे. आपणही जर आपल्या परिवारात कुणा भाईमध्ये, बहिणीसमान संस्कार पाहून त्याची निर्भत्सना केली वा गंमतीने चिडविले तर ते महापाप असेल व राज्यघटनेला धरून नसणार. आपण एक नवीन दुनिया बनवायला निघालो आहोत. त्यात सामील होण्याचा अधिकार त्यांनाही आहे. **आज आपली संस्था ही महान दिव्य अशी एक प्रकारची महासत्ताच होत आहे. आपल्याला अशक्य असे आता काहीच नाही. आपण सर्वांनी आपापल्या विभाग पातळीवर या तृतीयपंथीयांना ईश्वरीय अनुभव करविण्याची सेवा केली तर ती एक महान क्रांती होईल आणि परमात्मा म्हणतील 'वाह बच्चे वाह!'**

>> पान २९ वरून

अधिक त्रासदायक होतील. वर्तमान समय हा ड्राम्याचा महत्त्वपूर्ण अंतिम भाग असल्याने ह्या अंतिम भागातच महाविनाशाद्वारे कलियुगाचा अंत होऊन बहुतांश आत्मे केवळ मुक्ती प्राप्त करतील तर नऊ लाख राजयोगी आत्मे मुक्ती नंतर अल्पावधीत जीवनमुक्तीही प्राप्त करतील. तत्पूर्वी सर्वच ज्ञानी, अज्ञानी आत्मे कर्मबंधन मुक्त होतील. कारण हा ड्रामा न्याय्यपूर्ण आहे. ज्याप्रमाणे अंतिम समयी कर्मभोग भोगून अज्ञानी आत्मे पावन होतात तर ज्ञानी तू आत्मे राजयोगाद्वारे पावन होतात. तद्वतच अज्ञानी आत्मे एकमेकांना सुख-दु:ख देऊन, कर्मबंधनाचा हिशोब सम समान करून कर्मबंधन मुक्त होतील. तर ज्ञानी तू आत्मे स्वपुरुषार्थाने कर्मबंधनमुक्त होतील. अर्थात जे आत्मे स्वपुरुषार्थाने कर्मबंधन मुक्त होतील तेच आत्मे संगमयुगी जीवनमुक्तीचा अनुभव प्राप्त करून सत्ययुग, त्रेतायुगातील प्राकृतिक जीवनमुक्तीचे अधिकारी बनतील. अर्थात त्यांना वीस जन्मांचे दैवी भाग्य प्राप्त होईल.

बंधुनो, सत्ययुग, त्रेतायुगात कर्मसंबंध अवश्य आहे. परंतु तेथे हे पाच मनोविकार अर्थात मायारावण नसल्याने जवळ-जवळ २५०० वर्षापर्यंत देवी देवतांच्यामध्ये कोणतीही कर्मबंधने निर्माण होत नाहीत आणि असा कर्मबंधनमुक्त दैवी समाज परमात्मा संगमयुगावर निर्माण करीत आहे. अशा स्वर्गीय व सुखदायी सत्ययुगी दैवी समाजात आपल्याला उच्चपद प्राप्त करावयाचे असेल तर त्यासाठी कर्मबंधन मुक्त होण्याचा पुरुषार्थ करणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक मनुष्य आत्म्याने जन्मजन्मांतर निर्माण केलेल्या भिन्न-भिन्न कर्मबंधनांचा न दिसणारा हिशोब सांप्रत समयी फार मोठा झाला आहे. ह्या कर्मबंधनांचा आरंभ द्वापर युगापासून झालेला आहे. ह्या द्वापरयुगापासून प्रथमत: मानवाला देहाभिमान निर्माण होतो व देहाभिमानामुळेच पाच विकारांची निर्मिती होते. ह्या कामक्रोधादी विकारांच्या अधीन होऊन कर्मे केल्याने ती विकर्मे होऊ लागतात आणि भिन्न-भिन्न कारणांनी एकमेकांच्या संबंधात येत असताना, ह्या विकर्मांच्यामुळे कर्मबंधने निर्माण होतात. क्रोधवश होऊन कोणी कोणाला कटुवचन बोलणे, ते कटुवचन ऐकून कोणी कोणाच्या देहाची कोणत्याही प्रकारे हानी करणे, प्रतिशोधाच्या भावनेतून अनेक नरहत्या केल्या जाणे, लोभवश कोणी कोणाच्या देहाची कोणत्याही प्रकारे हानी करणे, लोभवश कोणी कोणाची संपत्ती बळकाविणे. अशा भिन्न-भिन्न कारणांच्यामुळे कर्मबंधने निर्माण होतात. इतकेच नव्हे तर शरीराच्या मृत्युनंतरही आत्मा संबंधियांना अप्रत्यक्षपणे दु:ख देत असल्याने, त्यांच्या दु:खाला शरीर सोडलेला आत्माच अप्रत्यक्षपणे कारणीभूत होत असतो. **कोणाच्याही दु:खाला कारणीभूत होणे म्हणजेच कर्मबंधन निर्माण करणे होय! अहंकार व क्रोध हे पितापुत्र आहेत. अहंकार दुखविला गेला की, क्रोधाची निर्मिती होते. ह्या क्रोधामुळे कधी कधी नरहत्या होऊन जटिल अशी कर्मबंधने निर्माण होतात.** (क्रमश:)

बाबा! तुझ्या कृपेने धन्य जीवन झाले (अनुभव)

-ब्र.कु. सुरेखा वाघ, बोराडी, शिरपूर

माझी लौकिक आई शांताई, मोठ्या धार्मिक वृत्तीची होती. तिने माझ्या बालमनावर भक्तीचे संस्कार केले होते. त्यामुळे लहानपणापासूनच मी महादेवाची भक्ती करीत होती. भक्ती करत असतांना, माझ्या मनात नेहमी विचार येत असत - परमेश्वर कुठे राहत असेल? तो कसा असेल? तो आपल्याला दिसत का नाही? माझ्या आईला मी हे सारे प्रश्न विचारीत असे. आई काहीतरी सांगून माझे समाधान करीत असे. मोठी झाल्यावर माझे लग्न झाले व मी सासरी आली. माझे पती शिक्षक होते. परंतु त्यांना दारूचे जबरदस्त व्यसन होते. त्यामुळे घरात नेहमी अशांतीचे वातावरण असायचे. परिणामत: मी नेहमी दु:खाच्या सागरात बुडलेली असायची. घरात नेहमी भांडण-तंटा, कलह-क्लेश असल्याने, मी नेहमी चिंतित असे. मला जीवन नकोसे वाटू लागले होते. अशा परिस्थितीतून माझी सुटका व्हावी, यासाठी मी नेहमी महादेवाची प्रार्थना करीत असे. त्याने माझी प्रार्थना ऐकली व माझ्या जीवन परिवर्तनाचा तो क्षण आला.

एके दिवशी ब्रह्माकुमारी भगिनीशी माझी ओळख झाली. तिने मला सांगितले की नुकतीच आपल्या गावात प्रजापिता ब्रह्माकुमारी संस्थेची गीता पाठशाळा सुरू झाली आहे. तेथे सत्य गीता ज्ञान दिले जाते. ते ऐकून मनाला खूप शांती व आनंद प्राप्त होतो. मी लगेचच तिला होकार दिला व संध्याकाळी तिच्याबरोबर गीता पाठशाळेत गेली. तेथे गेल्यावर तिने मला आध्यात्मिक चित्रप्रदर्शनी थोडक्यात समजावून सांगितली. त्यानंतर शिरपूर सेंटरच्या टीचर, ज्योती दीदींनी माझा साप्ताहिक कोर्स केला. पुढे मी नियमितपणे गीता पाठशाळेत जाऊन, ज्ञानमुरली ऐकू लागली. त्यामुळे मला खूपच आनंद झाला. सन १९९८ मध्ये मी ज्ञानात आली. त्यावेळेस माझा मुलगा ७-८ वर्षाचा होता. तोही माझ्याबरोबर मुरली ऐकण्यासाठी येत असे. **माझे पती दारूच्या व्यसनातून मुक्त व्हावेत, यासाठी मी त्यांना रोज योगदानही करीत असे. थोड्याच कालावधीत त्यांच्यातही परिवर्तन घडून आले व त्यांनी दारूचा व मांसाहाराचा त्याग केला.** फलस्वरूप माझे जीवन पूर्णत: सुख-शांतीने भरपूर झाले. घरगृहस्थीत राहून कमलपुष्प समान जीवन आम्ही उभयता जगू लागलो.

थोड्या कालावधीनंतर मला व माझ्या मुलाला मधुबनला जाण्याची परवानगी मिळाली. ज्या महादेवाची मी जन्मोजन्मी भक्ती करीत होती, त्याच्याशी परममंगल मीलनाचा आनंद मला प्राप्त होणार होता. मला जणू उमंग-उत्साहाचे पंख लाभले होते. व मन परमात्म रंगी रंगून गेले होते. आम्ही जेव्हा मधुबनला प्राणेश्वर बापदादांची सन्मुख मुरली ऐकत होतो तेव्हा आम्हाला अतिशय सुंदर अनुभूती आली. आम्ही दोघेही अत्यंत भावविभोर झालो. हजार भुजावाला बाबा आपल्याला मदतीचा हात देत आहे; याची मला पदोपदी अनुभूती होत होती. संगमयुगात मातापिता बापदादा आपली मोठ्या प्रेमाने पालना करीत आहेत; याचा अनुभव येत गेला. **माझा मुलगा देखील ईश्वरीय कृपेने, लौकिक शिक्षणात सफल होत गेला. आज माझा मुलगा मेडिकलचे शिक्षण पूर्ण करून, वसई-विरार महापालिकेत मेडिकल ऑफीसरची नोकरी करीत आहे. प्राणेश्वर शिवबाबांच्या कृपा प्रसादाने घरात सुख-शांती नांदत आहे. खरोखरच माझे जीवन धन्य झाले.** त्यामुळे माझ्या मनात सदैव हाच भाव असतो.

उपकार तुम्हारा बाबा,
किन शब्दों में मैं गाऊँ।
इस दिलने जो पाया है,
वो कैसे मैं बतलाऊँ।।

त्याचबरोबर शिरपूर सेवाकेंद्राच्या दीदींनी तसेच ब्राह्मण परिवारानी मला जो स्नेह दिला, आत्मिक प्रेम दिलं, त्याबद्दल मी सर्वांची अत्यंत ऋणी आहे.

सदरचा लेख लिहिण्याचा माझा हेतू हाच आहे की विश्वाच्या कानाकोपऱ्यात माझ्यासारख्या अनेक दु:खी भगिनी असतील, त्यांनी खचून न जाता, परमात्मा शिव पित्यावर दृढ विश्वास ठेवावा व शिवबाबांच्या शक्तीची कमाल अनुभवावी. **आपल्या जवळच्या सेवाकेंद्रावर जाऊन ईश्वरीय ज्ञान व राजयोगाचा नियमित अभ्यास करावा व आपले जीवन भविष्य २१ जन्मांकरिता सुख, शांती, आनंद व प्रेमाने भरपूर करावे, हीच मंगलकामना!**

सचित्र सेवावृत्त

इचलकरंजी : महाशिवरात्री महोत्सवात नागेश्वर मंदिराची भव्य प्रतीकृती बनविण्यात आली होती. (जी ३५ फूट लांब १७ फूट रूंद व १९ फूट उंच होती) तेथे शिवदर्शनासाठी भाविकांनी केलेली गर्दी

श्रीरामपूर : मकरसंक्रांतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात भाषण करतांना ब्र.कु. रोहिणी बहेन, त्याप्रसंगी उपस्थित नगराध्यक्षा अनुराधा आदिक व नगरसेविका भारतीताई कांबळे, ब्र.कु. मंदा बहेन तसेच अतिथीगण

मेहकर : शिवरात्रीच्या कार्यक्रमात दीप प्रज्वलित करतांना डॉ. लाहोटी, डॉ. लाहोटी मॅडम, डॉ. लोहिया, डॉ. मंत्री व ब्र.कु. मीरा बहेन

गडचिरोली : मकरसंक्रांती निमित्त १५० मातांना शिवबाबांचा संदेश देतांना ब्र, कु, नलिनी दीदी, शेजारी नगराध्यक्षा योगिताताई पिपरे

सटाणा (मालेगाव) : शालेय विद्यार्थ्यांना सकारात्मक चिंतन व राजयोग शिकवतांना ब्र. कु. भगवानभाई (शांतिवन)

पुणे (सदाशिव पेठ): महाशिवरात्रीचे रहस्य समजावून सांगतांना ब्र.कु.लता दीदी, शेजारी डॉ. सौ. सुनंदा एडके व भ्राता रामजी एडके तसेच ब्र.कु. शामकांत भाई

सांगोला (सोलापूर) : 'परमात्म शक्तीद्वारे विश्व परिवर्तन' या कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना नगराध्यक्षा राणी माने, उपनगराध्यक्ष सतीश माळी, ब्र.कु. यशोदा व इंदिरा बहेन तसेच अन्य नगरसेविका

घणसोली (नवी मुंबई) : जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित नगरसेविका उषा पाटील, नगरसेविका सुवर्णा पाटील, ब्र.कु. शीला दीदी व अन्य मान्यवर महिला

मलकापूर (कोल्हापूर) : जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. सर्जेराव पाटील यांना ईश्वरीय संदेश दिल्यानंतर भेटवस्तू देतांना ब्र.कु. वंदना, ब्र.कु. वर्षा व डॉ. प्रिया अंबिके

धरणगाव : महाशिवरात्री निमित्त शिव-शंकर चैतन्य झांकीचे उद्घाटन करतांना ब्र.कु. संजीवनी व सविता बहेन

नातेपूते (सोलापूर) : शिवरात्री निमित्त आयोजित कार्यक्रमात दीप प्रज्वलन करतांना यदूगिरी महाराज, ब्र.कु. जयश्री, राणी व निशा बहेन

अहमदनगर : सुमारे १ लाख १० हजार लोकांच्या विशाल जनसमुदायास राजयोग मेडिटेशन शिकवतांना ब्र.कु. डॉ. दीपक हरके (हे देखील एक जागतिक रेकॉर्ड नोंदविण्यात आले.)